CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. १५ मे २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २२५ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## रिंकू आणि नितिशने केली चेन्नईची धुलाई केकेआरने विजयासह आव्हान कायम ठेवले



✔ **चेन्नई** : रिंकू सिंग आणि नितिश राणा यांनी चेन्नईच्या गोलंदाजीची जोरदार धुलाई केली. त्यामुळे केकेआरच्या संघाला यावेळी विजयासह आपले आव्हान जीवंत ठेवता आले आहे. या सामन्यापूर्वी केकेआरचे १० गुण होते, पण या विजयानंतर आता त्यांनी प्ले ऑफचे आव्हान कायम ठेवले. चेन्नईने यावेळी केकेआरपुढे विजयासाठी १४५ धावांचे आव्हान ठेवले होते. पण रिंकू आणि राणा यांनी दमदार फलंदाजी करत संघाला सहा विकेट्स राखून विजय मिळवून दिला.

**आयपीएल सामना क्र.६२**

Vs

**गुजरात विरुद्ध हैदराबाद**

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : अहमदाबाद

# सुशीलकुमार शिंदे झाले 'कमांडर'



## कर्नाटकच्या निरीक्षकपदी नियुक्ती

## मुख्यमंत्रीपदाची 'दहीहंडी' फोडणार

## मुंबईहून सोलापूरला आले, श्रेष्ठींचा आदेश येताच बंगळुरूला गेले

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**कर्नाटकात नव्या मुख्यमंत्रीपदाची निवड करण्यासाठी काँग्रेस पक्षात जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. हे पद खेचून घेण्यासाठी ज्येष्ठ नेते तथा विजयाचे शिल्पकार डी. के. शिवकुमार आणि माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. दरम्यान मुख्यमंत्रीपदाच्या निवडीसाठी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा सोलापूरचे सुपुत्र सुशीलकुमार शिंदे यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हायकमांडचा आदेश आल्यानंतर शिंदे हे रविवारी सोलापुरातून विमानाने तातडीने बंगळुरूला रवाना झाले. मुख्यमंत्रीपदाची दहीहंडी फुटेपर्यंत शिंदे हे बंगळुरूतच तळ ठोकणार असून तेच या पदावरच्या व्यक्तीची घोषणा करतील. हे निरीक्षकपद म्हणजे शिंदे यांना अ. भा. काँग्रेस महासमितीत पुन्हा मानाचे स्थान मिळाल्याचे मानले जात आहे. शिंदे यांना कर्नाटकच्या सत्तेचे 'कमांडर' झाल्याने सोलापूरच्या काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.**

झाले असे की-सुशीलकुमार शिंदे व त्यांच्या कन्या आ.प्रणिती शिंदे यांचे रविवारी सकाळी सिद्धेश्वर एक्स्प्रेसने सोलापुरात आगमन झाले. वडील आणि कन्या हे जनवात्सल्यमध्ये आले. आ. प्रणिती ह्या कर्नाटकात ज्या ज्या ठिकाणी प्रचाराला गेल्या होत्या, तिथले सर्व उमेदवार निवडून आले. त्याबद्दल शहर काँग्रेस समितीने काँग्रेस भवन ते जनवात्सल्यपर्यंत जल्लोषाची मोटारसायकल रॅली काढली. उत्साही वातावरणात जनवात्सल्यवर आ. प्रणिती शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. या आनंदाच्या माहोलातच सकाळी अकराच्या दरम्यान सुशीलकुमार यांचा मोबाईल खणखणला आणि निरीक्षकपदी निवड झाल्याची वार्ता दिल्लीहून थडकली. आणि तेथे उपस्थित असणाऱ्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

जनवात्सलवर थोडा वेळ थांबून काँग्रेस हायकंमाडने पाठवलेले विशेष विमानाने ते तातडीने बंगळूरकडे रवाना झाले. मुख्यमंत्रीपदाची निवड होईपर्यंत शिंदे हे बंगळुरूमध्ये ठाण मांडून बसणार आहेत. त्यांच्यासोबत दीपक बाबरया व जितेंद्रसिंह हे दोन सह-निरीक्षकही असतील. काँग्रेसमध्ये सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यात मुख्यमंत्रिपदासाठी चढाओढ सुरू आहे. कर्नाटकचेच असलेले काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे रविवारी संध्याकाळी गांधी कुटुंबीयांशी चर्चा केली म्हणे. हे सगळे नाट्य सुरू असताना, कर्नाटक काँग्रेसमधील घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी सुशीलकुमार शिंदेंना निरीक्षक म्हणून पाठवण्याचा निर्णय पक्षाकडून घेतला गेला.

काँग्रेसने तब्बल १० वर्षांनंतर कर्नाटकात स्वबळावर सत्ता मिळविली आहे. या यशाचे अनेक वाटेकरी असले तरी थेट मैदानावर लढण्यापर्यंतची जबाबदारी शिवकुमार आणि सिद्धरमय्या यांनी पार पाडली आहे. त्यामुळेच या दोघांची नावे मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत सर्वांत आघाडीवर आहेत.

निकाल जाहीर झाल्यापासून या दोघांची नावे चर्चिली गेली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे हेही कर्नाटकचेच आहेत. त्यामुळे त्यांचीही भूमिका महत्वाची ठरणार आहे. निर्णय जरी गांधी कुटुंबीय घेणार असले तरी नवनिर्वाचित आमदारांची मते जाणून घेतली जातील, त्याबाबतचा ठराव हायकमांडकडे पाठविला जाईल. त्यानंतर कर्नाटकचा पुढचा मुख्यमंत्री कोण असेल, हे कळेल.

### खरगेंचा निर्णय...

अ.भा.काँग्रेस महासमितीचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे आणि सुशीलकुमार हे समवयस्क. विशेष म्हणजे दोघेही निष्ठावंत. पक्ष जी जबाबदारी देईल, ती निष्ठेने पार पाडायची हेच त्यांचे प्रमुख कर्तव्य. शिंदेंना कर्नाटकचे निरीक्षक म्हणून नेमण्याचा निर्णय खरगेंनी घेतल्याचे सांगण्यात येते. अ. भा. काँग्रेस महासमितीवर काम करताना शिदे यांची उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. ती जबाबदारी शिंदे यांनी समर्थपणे पेलली. श्रीमती सोनिया गांधी यांनी आंध्र प्रदेशच्या राज्यपालपदी नियुक्ती केल्यानंतर पक्षाचा आदेश शिरसावंद्य मानून शिंदे यांनी तीही जबाबदारी पार पाडली. पक्षाचा आदेश येताच ते बंगळुरूला रवाना झाले.

### संदेश आला आणि बंगळुरू गाठले...

जनवात्सल्यवर कर्नाटकाच्या विजयाचा जल्लोष सुरू असतानाच शिंदे यांना पक्षश्रेष्ठीचा निरोप आला. ती वेळ होती साधारण साडे आकराची. त्यानंतर शिंदे यांनी लागलीच बंगळुरूला जायची तयारी केली. दुपारी साडे चार वाजता बंगळुरूहून एक विमान सोलापूरच्या विमानतळावर आले. त्यातून शिंदे बंगळुरूला रवाना झाले. त्यांच्या समवेत शहर काँग्रेस समितीचे अध्यक्ष चेतन नरोटे हे होते. सायंकाळी साडे सहाच्या सुमारास शिंदे हे बंगळुरात दाखल झाले.

## प्रेमात अडसर ठरणाऱ्या नवऱ्याचा प्रियकराच्या मदतीने पत्नीने काढला काटा

✔ सुराज्य/मोहोळ

प्रेमात अडसर ठरणाऱ्या नवऱ्याचा प्रियकराच्या मदतीने मयताची पत्नी व तिचा प्रियकर यांनी वडाचीवाडी गावचे हद्दीतील शेतामध्ये खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने कॅनॉलच्या वाहत्या पाण्यात प्रेत टाकून दिले म्हणून मयताची पत्नी व तिचा प्रियकर या दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दादासाहेब हणमंत पवार (वय ३६, रा.हिवरे) असे खून झालेल्या व्यक्तिचे नाव आहे.

दादासाहेब हणमंत पवार हे २६ एप्रिलपासून घरी आले नाहीत म्हणून आजूबाजूच्या परिसरात व नातेवाईक यांच्याकडे शोध घेऊन ३० एप्रिल रोजी मोहोळ पोलीस ठाण्यात मिसिंग केस दाखल केली.

दरम्यान कामती पोलीस स्टेशन हद्दीत परमेश्वर पिंपरी गावचे शिवारात बशीर बागवान यांच्या शेताजवळ कॅनॉल मध्ये एक अनोळखी प्रेत वहात आले होते. ते पुरुष जातीचे अंगावर करड्या रंगाची अंडरविअर व हातात लाल रंगाचा गोफ होता. घटनास्थळी पंचनामा करून पोलिसांची तपासाची चक्रे फिरू लागली. आजूबाजूच्या पोलीस ठाण्यात युटूब चॅनल व्दारे मयताची ओळख पटवण्यासाठी आवाहन करण्यात आले. हे पाहून मोहोळ पोलीस ठाण्यातील बेपत्ता रजिस्टर नंबरचे तपासी अंमलदार संतोष चव्हाण व बेपत्ता मयताचे नातेवाईक यांनी मयताचे फोटो पाहिले व हे प्रेत दादासाहेब पवार यांचेच असल्याची नातेवाइकांनी सांगितले.



मयताचा सख्खा भाऊ राजेंद्र हणमंत पवार व मिसिंगची खबर देणारे गोविंद गुरुअप्पा पवार, दिनेश धोत्रे, समाधान हरिदास पाथरूट व आनंदकुमार श्रीरंग शिंदे या नातेवाइकांनी चौकशी मध्ये पोलिसांना माहिती सांगितली होती. ती कोन्हेरी येथे राहणारा अमोल ऊर्फ कृष्णा अंगद पांढरे हा दुधाचा व्यवसाय करीत असल्याने मागील सहा महिन्यांपासून वस्तीवर दूध काढून घेऊन जाणेकरिता तो येत जात होता. दरम्यान रंजना दादासाहेब पवार व अमोल ऊर्फ कृष्णा अंगद पांढरे यांचे प्रेमसंबंध चालू झाले होते. त्या दोघा नवरा बायकोमध्ये यामुळे सारखे भांडण व्हायचे. याबाबत वाद वाढू नये म्हणून हायवेवर असणारे हॉटेल संकेत येथे अमोल पांढरे यास नातेवाईकांनी बोलावून रंजना बरोबर असलेले प्रेम संबंध संपवण्या बाबत समजावून सांगितले होते. त्यास तशी त्याला ताकीद दिली होती, तरीही कोणी नसताना अमोल हा शेतातील वस्तीवर येत जात होता. त्यांमुळे रंजना व दादासाहेब यांच्यात पुन्हा वाद वाढला. त्यामुळे रंजना व अमोल ऊर्फ कृष्णा पांढरे यांच्या प्रेमात अडसर ठरणारा रंजनाचा नवरा दादासाहेब पवार यास २६ एप्रिल रात्री १० ते २८ एप्रिल सकाळी सव्वा नऊ वाजनेपूर्वी वडाचीवाडी गावचे हद्दीत शेतामध्ये दादासाहेब पवार यांना कोणत्यातरी हत्याराने डोक्यावर जबर मारहाण करून जिवे ठार मारून कॅनॉलमध्ये टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. असा संशय नातेवाइकांनी व्यक्त केला आहे. म्हणून मयत दादासाहेब पवार यांची पत्नी रंजना दादासाहेब पवार व तिचा प्रियकर अमोल ऊर्फ कृष्णा अगद पांढरे या दोघांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कामती पोलीस ठाण्यातील पोहे. कॉ. जीवराज जनार्धन कासवीद यांनी फिर्याद दाखल केली आहे. या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.



छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त रविवारी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी केलेला देखावा.

## विनापरवाना गौतमी पाटीलचा कार्यक्रम घेतल्याने गुन्हा दाखल

✔ सुराज्य/बार्शी

शासकीय परवानगी न घेता विनापरवाना सांस्कृतिक लावणी महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करून लोकांची गर्दी जमवून सार्वजनिक शांतता भंग केल्याप्रकरणी तसेच जिल्हाधिकारी यांचा जमाव बंदी आदेशाचा भंग केल्याप्रकरणी प्रजा शक्ती पार्टीचे राज्य प्रदेश अध्यक्ष राजेंद्र भगवान गायकवाड (रा. आगळगाव रोड, बार्शी) वर बार्शी शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पो. कॉ. अमोल वाडकर यांनी फिर्याद दिली आहे.

दि १२ रोजी सायंकाळी ७ वाजता शहरातील कुर्डुवाडी रोड जैन मंदिर जवळ शेटे मळा येथे गौतमी पाटील यांच्या लावणी महोत्सव कार्यक्रमासाठी गायकवाड यांनी सशुल्क पोलीस बंदोबस्त व परवानगी मिळण्याबाबत अर्ज पोलिसांकडे केला होता. त्या अनुषंगाने कार्यक्रमात अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये याकरीता महावितरणचे वीज पुरवठा मंजुरी बाबतचे प्रमाणपत्र, आपत्कालीन अग्निशामक यंत्रणा, अम्ब्युलन्स व वैदयकीय यंत्रणा उपलब्ध करून दिले बाबतचे प्रमाणपत्र आदी बाबींची पुर्तता केल्यानंतर व पोलीस बंदोबस्ताचे शुल्क भरल्यानंतरच कार्यक्रमास परवानगी व सशुल्क पोलीस बंदोबस्त देण्यात येईल असे पोलिसांनी गायकवाड यांना कळविले होते. परंतु गायकवाड यांनी या बाबींची पुर्तता न करता तसेच कोणतीही परवानगी न घेता दि १२ रोजी रात्री ८ वा ते १० वा च्या दरम्यान कुर्डुवाडी रोड जैन मंदिर जवळ शेटे मळा येथे कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमास अंदाजे ७०० ते ८०० जनसमुदाय जमा करून विनापरवाना लोकांची गर्दी जमवली. सार्वजनिक शांतता भंग केली आणि कार्यक्रम घेऊन जिल्हाधिकारी यांचा जमाव बंदिचा आदेश लागू असताना गर्दी जमवली अशा आशयाची फिर्याद दिली आहे.

## भटक्या कुत्र्याने चावा घेतलेल्या बालकाचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

भटक्या कुत्र्याने चावा घेतल्याने जखमी झालेला रोहान वसीम शेख (वय ९ वर्षे रा. शास्त्रीनगर सोलापूर) या मुलाचा उपचारादरम्यान रविवारी दुपारी मृत्यू झाला.

२० एप्रिल रोजी शास्त्रीनगर परिसरात भटक्या कुत्र्याच्या दंशाने



काही जण जखमी झाले होते. त्यात रोहान शेख याच्या देखील समावेश होता.त्यावेळी शासकिय रुग्णालयात उपचार करून त्याला डिस्चार्ज देण्यात आला होता. शनिवारी त्याला त्रास होत असल्याने पुन्हा शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तो रविवारी मरण पावला. या घटनेची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

## पाणी भरताना मोटारीचा शॉक बसल्याने महिलेचा मृत्यू

✔ **सोलापूर** : नळाला विजेची मोटार लावून पाणी भरत असताना शॉक बसल्याने शबनम अब्दुल रजाक पिरजादे (वय ४२) ही महिला उपचारापूर्वी मरण पावली . ही घटना मजरेवाडी येथील आनंदनगर भाग-१ येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्या काल रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास घरात विजेची मोटर लावून पाणी भरत होत्या . त्यावेळी अचानक शॉक बसल्याने त्या बेशुद्ध झाल्या . मेहबूब (मुलगा) यांनी त्यांना शासकिय रुग्णालयात दाखल केले असता त्या उपचारापूर्वीच मयत झाल्या . या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



शक्यतो रात्रीच कामे करण्याचा प्रयत्न करतोयं!

## महसूल विभागाचा झाला निर्णय, मात्र अमंलबजावणीचे घोडे अडले

### ▸▸ नव्या वाळू धोरणाची अशी तऱ्हा, पालकमंत्री लक्ष देतील का?

✔ सुराज्य/सोलापूर

**राज्यात नव्या वाळू धोरणानुसार सहाशे रुपये ब्रास या दराने वाळू देण्याचा निर्णय महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठा गवगवा करत जाहीर केला. नगर जिल्ह्यात नव्या धोरणानुसार वाळू धोरणाची अंमलबजावणी चालू झाली.मात्र सोलापूर जिल्हात अमंलबजावणीचे घोडे अडले आहे. याला पर्यावरण विभागाचा अडथळा असल्याचे बोलेले जात आहे. प्रशासनाकडून अथवा गौण खनिज विभागाकडून कोणतीच प्रक्रिया अद्याप केली जात नसल्याने या निर्णयाच्या अमंलबाजावणीसाठी महसूल मंत्र्यांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे बोलेले जात आहे.**

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील सोमवारी सोलापूर दौऱ्यांवर येत आहेत. सोलापुरात त्यांचे सकाळी १०.४० वाजता सोलापूर विमानतळावर आगमन होणार आहे. दुपारी १२ वाजल्यापासून नियोजन भवन येथे सोलापूर जिल्ह्याच्या विकास आराखडा, खरीप आढावा बैठक उज़नी पाण्याचे नियोजन आढावा बैठक, आषाढी पालखी सोहळ्याचे नियोजन आणि वाळू डोपो आणि



गौणखनिज विभागाचा बैठक घेऊन आढावा घेणार आहेत. वास्तविक पाहता महसूल विभागाच्या वतीने नवीन वाळू धोरण जाहीर केले आहे. वाळू चोरीला आळा घालण्यासाठी सामान्य नागरिकांना कमी दरात वाळू मिळण्याची हे धोरण स्वीकारले आहे. १ मे कामगार दिना पासून या नव्या वाळू धोरणाची अंमलबजाणी केली जाणार असल्याचे महसूल मंत्री विखे पाटील यांनी सोलापुरात जाहीर केले होते. याबाबतचा शासन निर्णय देखील जाहीर झाला.

शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार सहाशे रुपये ब्रासप्रमाणे एका कुटुंबास एकावेळी ५० मेट्रिक टन म्हणजे जवळपास १२ ब्रास वाळू मिळणार आहे. त्यानंतर पुन्हा वाळू हवी असल्यास एका महिनाभरानंतर पुन्हा मागणी करावी लागणार आहे. नदीपात्रातील वाळू गटातून वाळू डेपोपर्यंत वाळूची वाहतूक ही ट्रॅक्टर किंवा सहा टायरच्या टिप्पर वाहनाद्वारेच केला जाणार आहे. हायवा किंवा डंपर यासारख्या जड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. वाहतूक करणाऱ्यांना वाहनांना जीपीएस यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे. वाळू वाहतूक करणाऱ्यांना वाहनांचा दर्शनी भाग हा पिवळ्या रंगाचा असणार आहे. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल बांधणाऱ्या तसेच दारिद्र्यरेषेतील लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत वाळू देण्याचा निर्णय नवीन वाळू धोरणात घेण्यात आला आहे. मात्र सोलापूर जिल्ह्यात प्रशासनाकडून कोणत्याची हालचाली अद्याप दिसत नाहीत. वाळू साठ्याचा सर्व्हे झाला नाही. किती साठ्यातून वाळू काढली जाणार यांची अंमलबजावणी नाही, वाळू वाहतुकीसाठी मक्तेदारांची निविदा देखील काढली गेली नाही, कोठे वाळू साठे निर्माण केले जाणार यांची कोणतीचा माहिती जिल्हा प्रशासनाकडे नाही प्रशासनास पर्यावरण विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नाही त्यामुळे कोणतीच प्रक्रिया झाली नाही. प्रक्रिया लवकर पूर्ण नाही झाली तर पावसाळा सुरू झाल्यास पुन्हा अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याकडे पालकमंत्र्यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.

CMYK

# आत्मविश्वास वाढला...

कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाल्याने या पक्षाचा आत्मविश्वास नक्कीच बळावला असेल. आगामी काही राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे कर्नाटकचीच रणनीती तिथे अवलंबली जाईल आणि ही राज्ये देखील जिंकण्याची या पक्षाला उर्मी लाभली आहे. कर्नाटक विधासभा निवडणुकीसाठी काँग्रेसने पूर्णतः स्थानिक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाच्या चक्रव्यूहात न अडकता स्वतःच्या मुद्द्यांवर ठाम राहिल्यामुळे काँग्रेसला कर्नाटकात घवघवीत यश मिळाल्याचे सांगितले जाते. आता हाच कित्ता पुढील वर्षी होणाऱ्या राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ या राज्यांतही गिरवायचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. मागच्या निवडणुकीत त्रिशंकू अवस्था निर्माण झाल्यानंतर काँग्रेसला जेडीएसबरोबर स्वतःची फरफट करून घ्यावी लागली. जास्त जागा जिंकूनही एच.डी.कुमारस्वामी यांना मुख्यमंत्रीपद द्यावे लागले.कारण भाजपाची फोडाफोडीची राजनीती सुरू झाली असती पण काँग्रेस-जेडीएस यांची सत्ता फार काळ टिकली नाही. त्याचा फायदा उचलत भाजपाने सत्ता हाती घेतली. आता जनतेने स्पष्ट बहुमत दिल्यामुळे काँग्रेसची जबाबदारी वाढली असून लोकांचे प्रश्न सोडवण्याचे मोठे आव्हान या पक्षाच्या नव्या सरकारपुढे असणार आहे. २०२४ ची लोकसभा आणि राजस्थान,मध्यप्रदेश,छत्तीसगड आणि तेलंगणा या राज्यांमधील विधानसभा निवडणुकांसाठी काँग्रेससाठी विधानसभेची निवडणूक हा एक प्रकारे उपांत्यपूर्व सामना होता.या विजयामुळे काँग्रेससाठी भाजपाच्या महाकाय शक्तीसमोर कसे लढावे, डावपेच कसे आखावेत आणि कसे जिंकावे याची एक प्रकारे रंगीत तालीम झाली आहे. कर्नाटकचा विजय काँग्रेससाठी मनोबल वाढविणारा विजय ठरला आहे. तत्पूर्वी डिसेंबर २०२२ मध्ये, हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसने भाजपाची सत्ता उलथवून लावली. २०१९ नंतर काँग्रेसने एकाही राज्यात स्वबळावर विजय मिळवलेला नव्हता. हिमाचलपासून त्याची सुरुवात झाली. दोन्ही राज्यांतील विजयामुळे भाजपाने काँग्रेसबद्दल जे नकारात्मक वातावरण प्रचारातून तयार केले होते, त्याला तडा गेला आहे. त्यामुळे भाजपाविरोधात ताकदीने लढण्यासाठी काँग्रेसला आता नवे बळ मिळाले आहे. येत्या काही दिवसांत आणखी चार राज्यांमध्ये निवडणुका होत आहेत. त्यापैकी राजस्थान आणि छत्तीसगढ येथे काँग्रेसची सत्ता आहेच. कर्नाटकच्या विजयामुळे काँग्रेसला पुढील निवडणुका लढण्यासाठी नवा आत्मविश्वास तर मिळाला आहेच. त्याशिवाय मतदारांना भुरळ पाडून स्वतःच्या बाजूला वळविण्याची काँग्रेसची जादू अद्यापही कायम असल्याचे दिसले आहे. पण, मिळालेली सत्ता नैतिकतेच्या मार्गाने चालवावी लागणार आहे. कारण कर्नाटकच्या विधानसभेसाठी विजय मिळाला, याचा अर्थ लोकसभेला विजय मिळेलच, असा होत नाही. २०१८ साली काँग्रेसने राजस्थान, छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळवला. पण चारच महिन्यानंतर याच तीन राज्यांत झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसचा सुपडा साफ झाला होता. राजस्थानमध्ये लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला भोपळाही फोडता आला नाही. मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ येथे कशीबशी एक जागा राखता आली. तसेच २०१८ साली कर्नाटकमध्ये काँग्रेस आणि जेडीएसचे सरकार असतानादेखील २०१९ रोजी झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने राज्यातील २८ पैकी २५ जागांवर विजय प्राप्त केला होता. काँग्रेस आणि जेडीएसला प्रत्येकी एक जागा मिळवता आली. काँग्रेस आणि बरेच विरोधी पक्ष सध्या २०२४ च्या निवडणुकांसाठी भाजपाच्या विरोधात एकजूट होण्यासाठी चर्चा करीत आहेत. भाजपाचा पाडाव करण्यासाठी अनेक मुद्द्यांवर एकमत बनविण्याचे काम विरोधकांकडून सुरू आहे. यापैकी बऱ्याच विरोधकांना काँग्रेसची अडचण वाटत होती. तसेच काँग्रेसने विरोधकांचे नेतृत्व करावे, इतकी त्यांची ताकद आहे का, असाही प्रश्न उपस्थित केला जात होता. बिहारमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत एकूण लढविलेल्या जागांपैकी अर्ध्या जागाही जिंकून येणे काँग्रेसला अवघड गेले होते. विजयाचे श्रेय राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना जाते. जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कशी करणार? हा खरा प्रश्न आहे.अभिवचने देणे सोपे असते पण त्याची पूर्तता करणे खूप कठीण असते.विरोधात असताना वाट्टेल ते बोलता येते पण सत्तेत आल्यानंतरच वास्तव कळत असते.कारण सत्ता शहाणपण शिकवत असते.काँग्रेस सत्ता कशी पचवणार हेही तितकेच महत्वाचे आहे.



## सामाजिक

# शासन आपल्या दारी

*मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून राज्यात शासन आपल्या दारी' हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ दि.१३ मे रोजी सातारा जिल्ह्यातील दौलतनगर (ता. पाटण) येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. या पार्श्वभूमिवर शासन आपल्या दारी या अभियानाचा हेतू सांगणारा विशेष लेख..*

सर्वसामान्यांची कामे स्थानिक पातळीवर व्हावीत, त्यांना विविध योजनांचे लाभ मिळावेत यासाठी शासन थेट जनतेच्या दारी जाणार आहे. यासाठी 'शासन आपल्या दारी' हे अभियान सुरू करण्यात आले असून, शेवटच्या गरजू व्यक्तीपर्यंत शासकीय योजना पोहोचण्यास व कमीत कमी कागदपत्रे, जलद मंजुरी व शासकीय निर्धारित शुल्कात नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास हे अभियान उपयुक्त ठरणार आहे.

कल्याणकारी राज्यव्यवस्थेच्या माध्यमातून राज्यातील सर्व नागरिकांच्या आर्थिक आणि सामाजिक कल्याण व सुरक्षेला प्राधान्य दिले जाते. या अनुषंगाने शासनस्तरावर जनकल्याणाच्या अनेक योजना घोषित करण्यात आल्या आहेत. योजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये विशिष्ट आर्थिक तरतूद केली जाते. शासकीय यंत्रणा सदर योजनांची प्रचार-प्रसिद्धी करून या योजनांची नियमितपणे अंमलबजावणी करीत असतात. मात्र यासाठी नागरिकांना शासकीय कार्यालयामध्ये येणे, योजनांची माहिती घेणे, योजनेसाठी आवश्यक असलेले दस्तऐवज विविध कार्यालयात जाऊन जमा करणे, जमा केलेले कागदपत्र पुन्हा सादर करण्यासाठी कार्यालयाकडे येणे अशा विविध प्रक्रियेतून जावे लागते.

नागरिकांना दस्तऐवज उपलब्ध करून देणारी ही कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयात जावे लागते. तसेच सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्या दूर करण्यासाठी वारंवार त्या कार्यालयामध्ये जावे लागते. काही वेळा अनेक




लोकांना त्यांना शासनाकडून देय असलेल्या योजनांची माहिती नसते आणि माहितीअभावी या योजनांचा लाभ गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे या योजनांचा उद्देश पूर्णपणे सफल होत नाही.

या पार्श्वभूमिवर शासकीय योजना लोकाभिमुख करुन त्यांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी 'शासन आपल्या दारी' हे अभियान राबविण्याचे शासनाने ठरविले आहे. या अभियानांतर्गत नागरिकांना शासकीय योजनांशी निगडीत कार्यालयांचे प्रतिनिधी व विविध दस्तऐवज उपलब्ध करून देणारे अधिकारी व कर्मचारी एका छताखाली एकत्र येऊन विविध योजनांचे लाभ देतील. राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये दिनांक १५ एप्रिल ते १५ जून, २०२३ या कालावधीत हा उपक्रम राबवण्यात येत आहे. याचा समन्वय मुख्यमंत्री सचिवालयाच्या जनकल्याण कक्षामार्फत करण्यात येत आहे.

'शासन आपल्या दारी' या उपक्रमाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर जनकल्याण कक्ष स्थापन करण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी हे अभियानाचे जिल्हा प्रमुख असून इतर सर्व विभाग हे त्यांच्या समन्वयाने काम करत आहेत. या उपक्रमाच्या पूर्वतयारीअंतर्गत दिनांक १५ एप्रिल ते १५ मे २०२३ या कालावधीत नागरिकांना विविध विभागांच्या योजनांची माहिती देणे, प्रस्तावित लाभार्थ्यांची यादी तयार करणे तसेच त्यांच्याकडून अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही सुरू आहे. विविध दाखले, आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण, कृषि, महिला व बालविकास, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महसूल, रोजगार, कामगार, नगरविकास, ऊर्जा, सहकार, विविध विकास महामंडळे अशा विविध विभागाच्या योजनांच्या प्रस्तावित लाभार्थींची यादी करण्याचे काम सुरू आहे. या अभियानातून सोलापूर जिल्ह्यामध्ये किमान %५ हजार लाभार्थ्यांना थेट लाभ मिळण्याचे ध्येय ठरविण्यात आले आहे. प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर २ दिवसांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

**- जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर**

## टुडेज् ब्लॉग

# काँग्रेसला विक्रमी यश

*कर्नाटकात १९८९ पासून झालेल्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला काँग्रेला मिळालेल्या यशासारखे भरघोस यश मिळाले नव्हते. ह्या निकालाचे महत्त्व केवळ कर्नाटकपुरतेच आहे असे नव्हे. केंद्रात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपा आघाडीचे सरकार अधिकारारूढ झाल्यापासून झालेल्या निवडणुकीच्या इतिहासातही ह्या निकालाचे महत्त्व राहील असे निर्विवादपणे म्हणावेसे वाटते. विशेषत: राहूल गांधींना पप्पू' संबोधून मोदींनी त्याची यथेच्छ खिल्ली उडवली होती. श्रोत्यांच्या करमणुकीपलीकडे त्यातून काही निष्पन्न झाले नाही. ह्याउलट मोदी आडनावाचे तिन्ही जण चोर कसे असा टोमणा भाषणाच्या ओघात राहूल गांधींनी मारल्याबद्दल त्यांच्याविरूध्द गुजरातमध्ये भाजपा नेत्यांनी कोर्टबाजी केली; इतकेच नव्हे, तर राहूल गांधींचे लोकसभा सदस्यत्व रद्द केले. खासदार म्हणून राहूल गांधींना मिळालेले निवासस्थानही त्यांना खाली करण्यास भाग पाडले.*

व्यापारी तत्तावर भाडे आकारून खासदाराला हंगामी काळासाठी त्या निवासस्थानात राहू देण्याची स्पष्ट तरतूद कायद्यात आहे. ह्या तरतुदीचे केंद्रीय लोकसभा सचिवालयास भान उरले नाही. वास्तविक लोकसभा सचिवालयास नियमांचे भान असते तर राहूल गांधींशी पत्रापत्री करत सचिवालयाने वेळ मारून नेली असती. पंतप्रधान कार्यालयाचे सचिव आणि लोकसभा सचिव ह्यांच्यात झालेली पत्रापत्री कधींच जाहीर केली जाणार नाही. उलट ती नष्ट करण्यात आल्यास आश्चर्य वाटणार नाही. ते काहीही असले तरी राहूल गांधी ह्यांचा करण्यात आलेला छळवाद कर्नाटकामधील जनतेच्या निश्चितपणे ध्यानात आला. त्याचेच प्रतिबिंब मतदानात पडले असावे !

दुसरा जीवनावश्यक मालाच्या महागाईचा आणि पेट्रोल, डिझेल, गॅस इत्यादी जीवनाश्यक इंधनाची महागाईदेखील भाजपाच्या पराभवास कारणीभूत ठरली असेल. कर्नाटक जनता दलाचेही निकालाबद्दलचे अंदाजअडाखे चुकले हेही ह्या निवडणुकीच्या निकालावरून स्पष्ट झाले.

अर्थात कर्नाटक काँग्रेसचे नेत्यांची कर्तबगारीही ह्या निकालातून स्पष्ट दिसली. गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक नेतृतवाला फारसे महत्त्व न देता तिकिट वाटप करण्याचा खाक्या काँग्रेस नेतृत्वाने अवलंबला होता. नेतृत्वाला दुजोरा देण्याची वहिवाट कार्यकारिणीने न चुकता पाळली. पक्षप्रमुख म्हणतील तेच धोरण, तोच निर्णय असा अलिखित संकेत काँग्रेस पक्षात आहे. त्याचा जाणकारांच्या मते आणखी एक वेगळा अर्थ आहे. तो म्हणजे मोठ्या रकमेची देवघेव! अर्थात ह्याला चमत्कार' असा सांकेतिक शब्द रूढ झाला आहे. ह्या शब्दाचा गर्भित अर्थ लॉबी रिपोर्टर्सना चांगलाच माहित आहे.

ह्या वेळी पूर्वापार चालत आलेले संकेत बदलले असावेत. सोनिया गांधींऐवजी प्रियंका गांधी-वधेरा आणि नवे अध्यक्ष खडगे ह्यांच्याही निर्णय घेण्याच्या बाबतीत सल्लामसलत झालेली असावी. प्रियंका गांधींनी राहूलप्रमाणेच मैदानी सभा गाजवल्या. काँग्रेसच्या प्रियंकाच्या मैदानी सभा मोदींच्या रोड शो'पेक्षा अधिक प्रभावी ठरल्या असे काँग्रेसच्या यशाकडे पाहिल्यास म्हणावेसे वाटते.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा ! कर्नाटक निकालावरून २०२४ मध्ये होणा-या लोकसभा निवडणुकीतही काँग्रेसला यश मिळेला अस गृहित धरणे चुकीचे ठरेल. मतदानाच्या संदर्भात लोकांची मानसिकता अनेक वर्षांपासून स्पष्ट दिसून आली आहे. विधानसभेत ज्या पक्षाच्या उमेदवाराला मत दिले त्याच पक्षाच्या उमेदवाराला लोकसभा निवडणुकीतही लोक मत देतील असे मुळीच गृहित धरता येत नाही.



मतदारांच्या पक्षनिष्ठाही निवडून दिलेल्या प्रतिनिधींप्रमाणे बदलत असतात ! पहिल्या दोन निवडणुकात मतदार जेवढे कट्टर होते तेवढे नवे मतदार पक्षनिष्ठेबाबत कट्टर राहिलेले आहेत. मतदार कट्टर नाहीत. आमदार-खासदार कट्टर नाहीत. सत्तेवर आलेल्या सरकारमधील मंत्री कट्टर नाहीत. कुणीच कट्टर उरलेले नाहीत! ह्याचा अर्थ ते मूर्ख आहेत असा नाही. पुरोगामी, प्रतिगामी वा प्रागतिक सारीच्या सारी विशेषणे निरर्थक ठरली आहेत. कर्नाटक निवडणुकीच्या निकालाचा हाच बोध आहे: लोकशाही हक्क बजावताना कोणाचे काही ऐकायचे नाही ! कर्नाकच्या जनतेने आपला स्वत:चा लोकशाही हक्क बजावला आणि आपल्या राज्यातील सत्तापालट घडून आणला. प्रदीर्घ काळ सत्ता उपभोगणा-यांना घरी बसवले. कर्नाटकातली लोकशाही जागृत असल्याचा पुरावा त्यांच्या परीने दिला.

**- रमेश झवर**

## जन्म हा अखेरचा

# हृदयाचा संवाद हृदयाशी

मला इथे दादांचे एक वाक्य आठवते. दादा म्हणायचे, माणूस कधीही व्याख्यानाने, भाषणाने बदलत नाही, प्रवचनाने बदलत नाही, लेखाने नाही, तो बदलतो फक्त वैयक्तिक संपर्काने.' आपण नि:स्वार्थ प्रेमाने, ईश्वराचा संबंध घेऊन, माझा दैवी भाऊ म्हणून दुसऱ्या व्यक्तीशी संपर्क साधत नाही, तोपर्यंत आपण बदलत नाही आणि समोरचा माणूसही बदलत नाही. असे भेटल्याशिवाय निर्मळ नाते निर्माण होऊ शकत नाही. आता तुम्ही म्हणाल, दीदी, हा सोशल मीडियाचा जमाना आहे आणि तुम्ही काय प्रत्यक्ष प्रेमाने भेटण्याचे बोलता आहात?' पण, तुम्ही मला सांगा, आपण जेव्हा एखादा लेख, एखादा विचार वाचतो, तो आपल्याला किती वेळ लक्षात राहातो? दोन दिवस? चार दिवस? एक आठवडा? फार तर एक महिना; परंतु जी एखादी व्यक्ती आपल्याला प्रेमाने भेटलेली



असते आणि आपल्याला मनात घर करून राहील, असे काही तरी सांगून जाते, तो प्रसंग, ती व्यक्ती आपल्या कायम स्मरणात राहते की नाही? म्हणून आपल्याकडे वैयक्तिक संपर्काचा आग्रह होता. आपल्या ऋषींनी, संतांनी त्याच मार्गाने चालून दाखवले आहे.

मला हे सांगायला आनंद होतो, की आमच्या दादांनी हाच रस्ता घेतला. त्यांनी स्वतः वर्षानुवर्षे कुठल्याही प्रसिद्धीच्या अपेक्षेशिवाय अविरत भ्रमण केले. जवळपास सात दशके झाली, स्वाध्याय परिवारा'ने फक्त हाच वैयक्तिक संपर्काचा मार्ग उचलला आहे. आम्हाला सोशल मीडिया किंवा इतर प्रसारमाध्यमांची ताकद समजत नाही असे नाही; पण आम्हाला कार्याची पद्धती वैयक्तिक संपर्क हीच ठेवायची आहे. शेवटी सोशल मीडिया हे एक माध्यमच आहे ना? मग मी माध्यम कुणाला घ्यावे? या सर्व वस्तूंना' घ्यावे, की माझ्या देवाने दिलेल्या संबंधाला घ्यावे, हा प्रश्न आहे.

माणसाने माणसापर्यंत पोहोचलेच पाहिजे; पण ते हृदयापासून हृदयापर्यंत असायला हवे. आपण ये हृदयींचे ते हृदयीं घातले' म्हणतो ना, तस! असा हृदयाचा हृदयाशी संवाद घडेल, त्यात संपूर्ण निरपेक्षता असेल, त्यात भगवंताच्या सर्वांतील अस्तित्वामुळे निर्मळ दैवी संबंध बांधला जात असेल, तेव्हा आपण ऋषींच्या रस्त्याने चाललो आहोत, असे म्हणता येईल.

## जनमानस

# मद्याची भुरळ. !

मद्यपान आरोग्यासाठी धोकादायक असते, मद्यपान करणे महापाप आहे, नैतिकदृष्ट्या मद्यपान करणे अयोग्य आहे असे मानणारी माणसे एकेकाळी दारू विक्रेत्यांच्या दुकानांसमोर धरणे, आंदोलने छेडीत असत. तरीही दारूच्या व्यसनापासून लोकं दूर राहू शकत नाहीत आणि लागलेले व्यसन सहजासहजी सुटत नाही




याची प्रचिती येते. गरीब माणसं आपली दुःख विसरण्यासाठी मद्यप्राशन करतात, श्रीमंत लोक आपल्या शौकाखातर क्लब,पबमध्ये जाऊन मद्यप्राशन करतात, आपल्या व्यवसाय वृद्धिकरिता, भेटीगाठी होतात अशा ठिकाणी मद्याला महत्त्व दिले जाते. काही सणांपूर्वी मद्याचा साठा करुन ठेवला जातो. दारू न पिणारा मागासलेला म्हणून ओळखला जातो. मद्याच्या आहारी गेलेल्यांनी एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या काळात ३९.५ कोटी मद्याच्या बॉक्सेसमधील प्रत्येकी ७५० मिली लिटरच्या ४.५ अब्ज बाटल्या रिचविल्या आहेत. भारतीयांना बिअर, रम यांपेक्षा स्कॉच व्हिस्कीने अधिक भुरळ घातली आहे. सन २०२२ मध्ये २१९ दशलक्ष बाटल्या स्कॉच व्हिस्की रिचविणाऱ्या भारतीयांनी स्कॉच व्हिस्की पिण्यात जगातील सर्व देशांतील लोकांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला आहे. पोरबंदर, वर्धा या महात्मा गांधींच्या जन्म,कर्म, भूमींमध्ये जारी केलेली दारूबंदी अल्पायुषी ठरली. दारूचे भाव वाढते असूनही पिणाऱ्यांची संख्याही वाढतच जात आहे. बिहार तसेच अन्य राज्यांत विषारी, भेसळयुक्त दारू प्राशन केल्यामुळे कित्येकजण जीव गमावून बसले. देशातील राज्य सरकारे दारूवर कर लावून त्याद्वारे मिळणाऱ्या महसुलात वाढ होत असल्यामुळे लोकांच्या आरोग्यापेक्षा महसुलात अधिक स्वारस्य दाखवित आहेत. म्हणूनच दारूबंदीवर मर्यादित विक्री किंवा अन्य प्रकारची बंधने लादण्यात चालढकल करीत आहेत असे वाटते. मद्यप्राशनाने लोकांचे आरोग्य बिघडतेच शिवाय मद्याच्या नशेमुळे गुन्हेगारी, वादविवाद, कौटुंबिक कलह, मनस्ताप यांत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. तरीही वाढत्या महागाईला तोंड देताना व्यसनी लोकं जीवनावश्यक वस्तूंवरील खर्च कमी करीत काटकसर करीत आहेत. अपवाद आहे तो ... मद्याचा !

**- स्नेहा राज, गोरेगांव.**



## - संतविचार -

डॉ. देविदास गुरव, सोलापूर

# 'पार्था तो संन्यासी जाण'

**'आणि मी माझें ऐसी आठवण । विसरले जयाचे अंतःकरण । पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ' ।। ५/२०**

संत ज्ञानेश्वरांनी वरील ओवीत संन्याशाची उत्तम व्याख्या केली आहेच शिवाय 'सन्यासीपणाचे' विवेचनही अत्यंत सुंदर केले आहे. ते म्हणतात, 'ज्याच्या अंतःकरणामध्ये 'मी' आणि 'माझे' याचे स्मरणच राहिलेले नाही. अर्जुना, तो सदोदित संन्याशीच आहे असे समज.अहंकार टाकला की संग तुटतो. राग-द्वेषाचा संग टाकून मानव निर्द्वंद होतो. हीच ज्ञानावस्था होय, हाच संन्यास होय.

विरस्तव विझून घेतल्यावर जो राखेचा निव्वळ ढेपसा शिल्लक राहतो त्याला कापसामध्ये सुद्धा गुंडाळून ठेवता येतो. त्याप्रमाणे ज्याच्या बुद्धीत संकल्प नाही तो उपाधीत असूनसुद्धा कर्मबंधात अडकत नाही. म्हणून ज्या वेळेला कल्पना सुटते त्याच वेळेला संन्यास घडतो. म्हणून कर्मसंन्यास आणि कर्मयोग सारखेच असे माऊलीचे सांगणे आहे.

आपल्याला भौतिक विश्वाची ज्याच्यामुळे जाणीव होते त्यांना इंद्रिय असे म्हणतात. मन, चित्त, बुद्धी आणि अहंकार या अंतः करणाच्या चार प्रवृत्ती आहेत. संकल्प आणि विकल्पांची धारणा जेथे होते त्याला मन असे म्हणतात. मनाचे जे संकल्प विकल्प होतात त्याचे अनुसंधान त्याला चित्त म्हणतात. मन मनन करते तर चित्त चिंतन करते. जे स्विकारते ती बुद्धी होय. जो कर्म करायला प्रवृत करतो तो अहंकार होय. संन्याशी हा जाणिवेच्या आणि अंतःकरण चातुष्ट्याच्या पलीकडे गेलेला असतो.

मन, चित्त, बुद्धी आणि अहंकार सोडून पलीकडे जाणे फार अवघड असते. मनुष्य भौतिक सुखाच्या जंजाळात अडकून पडतो. असत्य नि अज्ञानात गुरफटतो.सन्यस्त मार्गाचा विसर पडतो.कर्तेपणात रममाण होतो.तो कसा सन्यस्त होण्यास प्रवृत्त होईल?. इ. सर्व शंकांचे निरसन माऊली करतात. गुरूकृपेच्या आधीन राहून अभ्यास नि अनुभूतींच्या बळावर तिथे पोहोचता येते. जिथे ज्ञान, ज्ञेय आणि ज्ञाता ही त्रिपुटी मावळते तिथेच आत्मदर्शन आहे.यालाच योगिराज ज्ञानेश्वरांनी सन्यस्तास्थिती संबोधले आहे.

अप्रिय कर्माबद्दल ज्यला द्वेष वाटत नाही. कर्मफलाची जो कधींच अपेक्षा करत नाही, जो समत्त्व बुद्धीने वावरतो व तटस्थपणे पाहतो तोच खरा संन्याशी होय. हा कर्मसंन्यास कर्मयोगाने सुद्धा साधता येतो. असे भगवंत म्हणतात. कर्माचे कर्तेपण स्वतःकडे न घेता त्याचे श्रेय किंवा समर्पण भगवंताचरणी करतो ते खरे सन्यासीपण होय.अहंकार व आसक्तीचा परित्याग ,सत्संग व सद्विचारांची मनी आस 'निर्विकल्पे स्वधर्माचरण 'आहार-विहार' व विचार सात्विक वाणीचे अनुसरण हेही सन्यस्ताचेच लक्षण होय.



सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# छत्रपती संभाजीराजे जयंती मिरवणुकीत तरुणाई थिरकली

✔ सुराज्य/सोलापूर

भव्य डिजेचा दणदणाट, उंच उंच कटाउट आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या सुंदर मूर्ती, प्रभू राम शिवशंकराचे आकर्षक देखाव्यासह रविवारी सायंकाळी मिरवणुकीला प्रारंभ झाला.

धर्मवीर संभाजीराजे मध्यवर्ती जयंती महोत्सव महामंडळाच्यावतीने एकत्रित काढण्यात आलेल्या मिरवणुकीत सुमारे २७ विविध मंडळे सहभागी झाले होते. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अमोल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व महामंडळाचे अध्यक्ष विकी सूर्यवंशी यांच्या नेतृत्वात रविवारी सायंकाळी पाचच्या सुमारास पार्क चौकातूर मिरवणुकीला प्रारंभ झाला. रविवारी मध्यरात्री पासून मोठमोठे कंटेनर सजविण्यात आले होते. भव्य डीजेमुळे गोंगाटातून नागरिकांना ये-जा करणे कठीण झाले होते. मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात तरुणाई नृत्य करत होती.





डिजेचे प्रमाण वाढले

पूर्वी गणेशोत्सव व शिवजयंती मिरवणुकीत लेझिम व कसरतींचे प्रयोग हे मुख्य आकर्षण असे. मात्र छत्रपती संभाजी राजे मिरवणुकीत २७ पैकी २५ मंडळाचे डीजे होते तर फक्त दोनच मंडळाकडे लेझिम संघ होते.

डिजेच्या अतिरेकामुळे नाशिक ढोल, पारंपरिक वाद्य, आकर्षक कसरतींचे प्रयोग व हालगींचा कडकडाट दिसला नाही. भव्य डिजेच्या गोंगाटामुळे नागरिक त्रस्त झाले होते.

मिरवणूक सुरू असतानाही वाहतूक सुरळीत मिरवणूक लवकर सुरू झाल्याने वेळेत संपली मर्यादित स्वरुपात फटाके, गुलालाची उधळण पोलिसांकडून प्रत्येक मंडळाच्या आवाजाची तपासणी केली पार चौक चार पुतळा सरस्वती चौक मेकॅनिकल छत्रपती शिवाजी महाराज चौक एसटी स्टँड ते संभाजी महाराज चौकापर्यंत मिरवणूक निघाल्या त्या मिरवणूक मार्गावर तरुणाईचा उत्साह मोठ्या प्रमाणावर दिसून आला मिरवणुका पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी झाली होती

## सोशल मीडिया वापरतांना त्रिसुत्रीचा अवलंब करा : डॉ. वडनेरे




✔ **सोलापूर** : सोशल मीडियाचा वापर करताना विवेकाबरोबर स्वनियमन, स्वनियंत्रण आणि स्वअनुशासन त्रिसुत्रीचा अवलंब केल्यास आपणास त्यापासून कुठलेही नुकसान होणार नाही असे प्रतिपादन डॉ सोमनाथ वडनेरे यांनी माउंट आबु राष्ट्रीय मीडिया संमेलनात केले. ब्रह्माकुमारीज मीडिया प्रभागातर्फे माउंट आबू येथे राष्ट्रीय मीडिया संमेलन आयोजित केले. यात देशभरातून प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सायबर माध्यम प्रतिनिधीं उपस्थित होते. डॉ सोमनाथ वडनेरे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी प्लानरी सेशनमध्ये सोशल मीडियाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. सोशल मीडियाचा विवेकी वापर नेहमी हिताचाच असून आवश्यक काळजी घेतल्यास त्यापासून निश्चित फायदा होतो असेही ते म्हणाले.

## आजच्या पिढीतील मुलींमध्ये कॅल्शियमची कमतरता : डॉ. दबडे

✔ **सोलापूर** : महिला आणि मुलींमध्ये कॅल्शीयमची कमतरता आढळून येत आहे हे भविष्यातील पिढीसाठी चांगले नाही असे प्रतिपादन डॉ.माधुरी दबडे यांनी केले. कृष्णामाई हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित हाडांची ठिसूळता शिबीरात त्या बोलत होत्या. या शिबीरात जवळपास दीडशे महिलांची तपासणी करण्यात आली.

गेल्या २९ वर्षापासून स्त्रीरोग आणि प्रसुतीशास्त्राच्या माध्यमातून सोलापूर शहर जिल्हा तसेच कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील महिलांवर योग्य उपचार करून अनेक महिलांना संतती प्राप्तीसाठी उपचार करण्याचे मोलाचे कार्य कृष्णामाई हॉस्पिटलच्या मधून करण्यात येत आहे. अनेक नवीन तंत्रज्ञानाच्या साह्याने आधुनिक उपचाराची सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यातून महिलांचे आरोग्य चांगले राहावे आणि त्यांना होणारी संतती सुदृढ व्हावी यासाठी प्रयत्न करणारे डॉ.राजीव दबडे, डॉ.बाहुबली दोशी,यांच्यासह तज्ञ डॉटरांचे मार्गदर्शन देण्यात येते. या शिबीरासाठी पुण्याहून अत्याधुनिक मशीन आणण्यात आली त्या मशीनच्या साह्याने महिलांच्या हाडांची ठिसूळता तपासण्यात आली.

## छोट्या व्यवसायिकांची मंगळवारी धरणे

✔ **सांगोला** : सांगोला शहरातील हातगाडी टपरी भाजीपाला फळ विक्रेते इत्यादी छोटे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांचे व्यवसाय अतिक्रमणाच्या नावाखाली सांगोला नगरपरिषद प्रशासनाने हटवू नयेत अगर बंद पाडू नयेत, या मागणीसाठी मंगळवार दि. १६ रोजी सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेमध्ये सांगोला नगरपरिषद कार्यालयासमोर छोट्या व्यवसायिकांचे एक दिवसाचे लाक्षणिक धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. शहरातील छोट्या व्यावसायिकांनी आपला व्यवसाय बंद ठेवून आपल्या कुटुंबातील सदस्यासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत लिगाडे यांनी केले आहे.

## अकलूज येथे पूर्वीच्या भांडणावरून कोयत्याने मारहाण

✔ **सोलापूर** : पूर्वीचे भांडण आणि घरासमोर येरझाऱ्या मारल्याच्या कारणावरून एका तरुणाला कोयता, दांडका आणि उलट्या तलवारी मारून जखमी करण्यात आले . ही घटना अकलूज येथील इंदापूर रोडवर असलेल्या बोडके पेट्रोल पंपाजवळ शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली . विकास बाळू भोसले (वय २८ रा.राऊत नगर अकलूज) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून अकलूजच्या पोलिसांनी शुभम दीपक ओरसे, कुणाल ओरसे, लखन खिल्लारे, सलमान शेख, अंबादास ओरसे आणि त्याची पत्नी (सर्व रा.राऊतनगर अकलूज ) अशा ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जखमी विकास भोसले हा पेट्रोल पंपाजवळून जात होता. त्यावेळी वरील आरोपींने अडवून त्याला मारहाण केली . अशी नोंद पोलिसात झाली . पुढील तपास हवालदार गुरव करीत आहेत.




## घाटणे येथील शेतकऱ्यास १४ लाखास गंडविले; जालनाच्या मुकादमावर गुन्हा

✔ **सोलापूर** : शेतातील ऊस तोडीसाठी मजूर पुरवतो म्हणून एका शेतकऱ्याला १४ लाख ६० हजार रुपयास फसविल्याची घटना कुर्डूवाडी येथे नुकतीच उघडकीस आली . या प्रकरणात कुर्डूवाडीच्या पोलिसांनी लक्ष्मण शिवाजी पारवे (वय ३५ रा. आसनगाव जि.जालना) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला . यासंदर्भात निंबाळकर या शेतकऱ्यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. लक्ष्मण पारवे हा १६ जून ते १० मे या दरम्यान ऊसतोड मजूर पुरवते म्हणून त्यांच्या कडून उचल घेऊन करार केला होता. कराराप्रमाणे वेळेत मजूर पुरवले नाही तसेच पैसे परत न देता फसवणूक केली. अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार मंडलीक पुढील तपास करीत आहेत .

## सारोळे येथे लाकडी दांडक्याने मारहाण दोन महिला जखमी

✔ **सोलापूर** : (ता.मोहोळ) येथे लाकडी दांडका आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत उषा पांडुरंग लादे (वय ५० ) आणि अश्विनी अनिल बनसोडे (वय २६ रा .सारोळे ) या दोघी जखमी झाल्या. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली . त्या दोघी घरातील अंगणात काम करीत होत्या . त्यावेळी अनिल मिलिंद बनसोडे, सुदामती बनसोडे आणि अन्य दोघांनी मिळून त्यांना अज्ञात कारणावरून मारहाण केली . त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून मदन सरवदे (भाऊ) यांनी सोलापूरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले . या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## माझ्याच पक्षातील नेत्यांनी मला त्रास दिला : बाळराजे

✔ सुराज्य/नोहोळ





तालुक्यात विरोधकांनी तर त्रास दिला पण माझ्या पक्षातील लोकांनी , मी पुढे येऊ नये व संघटना मोठी होऊ नये म्हणून पक्षातील काही नेत्याचा व कार्यकर्त्याचा हेतू होता म्हणून प्रयत्न केले आहेत. पक्ष वाढावा नविन कार्यकर्ते निर्माण करून कार्यकर्त्यांची फळी, संघटना बांधत असताना फार मोठे कष्ट घ्यावे लागलेय, असे मत लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी व्यक्त केले.

अर्जूनसोंड येथे लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांचा अभिष्टचिंतन सोहळा संजय निराधार समितीचे अध्यक्ष सज्जनराव पाटील, सोलापूर बाजार समितीचे संचालक जितेंद्र बाबा साठे राष्ट्रवादीचे प्रकाश चवरे ,बाजार समितीचे सभापती धनाजी गावडे , प्रशांत बचुटे यांच्या उपस्थित पार पडला.

जनतेसह युवकाचे प्रश्न मार्गी लागतायत यावरून युवकांची मोठी उपस्थिती आहे अर्जूनसोंड येथील कै रमेश सर्वगोड यांच चार मुलींच्या नावे डी सी सी बैकेत प्रत्येकी पाच हजाराची दाम दुप्पट ठेवीच्या प्रमाण पत्राचे वितरण बाळराजे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले व होम मिनीस्टर स्पर्धेतील महिलांना पैठणीचे महिला सरपंच मिना हावळेच्या हस्ते वाटप करण्यात आले

यावेळी राष्ट्रवादीचे राहुल मोरे ,डी सी सी बैकचे माजी संचालक भारत सुतकर ,कलिदास गावडे , उद्योजक रामदास चवरे ,लोकनेतेचे संचालक शुक्राचार्य हावळे , बाजार समितीचे माजी सभापती नागेश साठे , नुतन संचालक विकास कुंभार , शशीकांत पाटील , श्रीमंत पाटील , महेंद्र वाघमारे , आकाश तुपसमिंदर , हणमंत भोसले , महादेव हावळे आदीसह उपस्थित होते

## छत्रपती संभाजी महाराजांचे कर्तृत्व युवकांनी आत्मसात कराचे : देशम



### मध्यवर्ती महामंडळाच्या उत्सव मुर्तीची प्रतिष्ठापना

✔ सुराज्य/सोलापूर

छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या उत्सव मुर्तीची प्रतिष्ठापना शहर उत्तरचे आमदार माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते राष्ट्रवादी विद्यार्थी युवक कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य राणा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आली

छत्रपती संभाजी महाराजांनी वयाच्या चौदाव्या वर्षी बुधभूषण सारखा प्रदिर्घ संस्कृत ग्रंथ लिहिला. ब्रिज भाषेत नायिकाभेद नखशिख सातसतक हे ग्रंथ लिहिणारे जगातील सर्वात लहान वयातील साहित्यिक होते. एका वेळी इंग्रज, डच, पोर्तुगीज आणि मुगल या सारख्या शत्रूला आव्हान देत स्वराज्य विस्तार करणारे एक महान योध्दे शंभुमहाराज होते यांचा आदर्श युवकांनी घेतला पाहिजे असे विचार देशमुख यांनी यावेळी मांडले

यावेळी महामंडळाचे संस्थापक अमोल शिंदे, उत्सव अध्यक्ष अक्षय सुर्यवंशी,दास शेळके, अनंत जाधव, दिलीप भा कोल्हे, अनिकेत पिसे, प्रताप चव्हाण, तुकाराम मस्के, राम गायकवाड, प्रशांत पाटील, हरिभाऊ चौगुले, दत्ता मुळे, प्रकाश शिंदे, बापू वाडेकर, अक्षय जाधव, निखिल भोसले,किरण पवार, प्रकाश अवस्थी, संजय सरवदे, अक्षय होळकर, समीर लोंढे, वैभव विभुते, पोपट भोसले, प्रकाश ननवरे, सुनील भोसले, नाना शिंदे, संतोष जावळे, अक्षय बिद्री, निहाल शिवशिंगवाले, शशिकांत शिंदे, बाबा शेख, आशिष परदेशी, सूर्यधन सुतार, अल्फरान आबादीराजे, शिवा गुंदगे, यांच्यासह आदी शिवशंभू भक्त उपस्थित होते.

## मुळेगाव येथे झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : एका ५० वर्षीय इसमाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली . ही घटना मुळेगाव तांडा (ता.दक्षिण सोलापूर ) येथे रविवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. लक्ष्मण महादेव हाटकर (वय ५० रा. मुळेगाव तांडा) असे मयताचे नाव आहे.रविवारी पहाटे दीड वाजेच्या सुमारास झाडाला स्कार्फच्या साह्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.




## अनु. जाती आरक्षण वर्गीकरण व आर्टीची आवश्यकता

✔ सुराज्य/सोलापूर

अनु.जाती आरक्षण वर्गीकरण व आर्टि स्थापना आवश्यकता या विषयावर कार्यशाळा शनिवार दि १३ मे रोजी सायंकाळी ५ ते ८ च्या दरम्यान समाज कल्याण केंद्र, रंगभवन सोलापूर येथे झाली.

या कार्यशाळेमध्ये अनुसूचित जातीचे आरक्षण वर्गीकरण या विषयावर केशव शेकापूरकर,लातूर व .डॉ. अंकुश गोतावळे,चंद्रपूर यांनी मार्गदर्शन केले. तर डॉ. गणपतराव जिरोणेकर, नांदेड व रामचंद्र साठे, अकलूज हे बार्टीच्या धर्तीवर आर्टि (डॉ, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे प्रशिक्षण व संशोधन केंद्र) ची आवश्यकता या विषयावर मार्गदर्शन केले.प्रा.डॉ. दिगंबर झोंबाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेस माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, श्रीकांत बोराडे, रमेश बोराडे ,ज्येष्ठ पत्रकार भरतकुमार मोरे, संयोजक व सकल मातंग समाज राज्य समन्वयक सुरेश पाटोळे,टी.एस. क्षीरसागर,प्रा. परमेश्वर हटकर,प्रा . दीपक देडे, किशोर जाधव,प्रा . दशरथ रसाळ, सुधाकर पाटोळे, गोविंद कांबळे,ऍड.विक्रम कसबे, महादेव भोसले, विश्वेश्वर गायकवाड, सूर्यकांत केंदळे, बाळासाहेब रणदिवे लखन गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक संयोजक सुरेश पाटोळे यांनी केले. प्रास्ताविकामध्ये सुरेश पाटोळे यांनी कार्यशाळा घेण्यामागील उद्देश स्पष्ट केला.

लोकांच्या मनातील संभ्रम दूर होण्यासाठी ही कार्यशाळा घेतली असल्याचे सांगितले. अध्यक्ष मनोगतात डॉ. दिगंबर झोंबाडे यांनी, स्व.बाबासाहेब गोपले यांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ निर्माण झाले. त्याच पद्धतीने मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी व पी.एच.डी.फेलोशीप साठी मआर्टीफ होणे अत्यंत आवश्यक आहे , अशी मागणी करत या कार्यशाळेतून अनेक शंकांचे निरसन झाल्याचे सांगितले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी ओंकार पाटोळे, शिवाजी पाटोळे, बापूजी गायकवाड, हरिबा कांबळे,महेश तेजबिंदे, महेश जोगदंड विश्वनाथ पाटोळे आदींनी परिश्रम घेतले.

## सुशीलकुमार, प्रणितींचा जनवात्सल्यवर जंगी सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर



कर्नाटकातील कॉँग्रेसच्या घवघवीत यशानंतर आज रविवारी सकाळी सोलापुरात आलेले माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व आमदार प्रणिती शिंदे यांचा सात रस्ता येथील येथील जनवात्सल्य येथे कॉँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जंगी सत्कार करुन फटाक्यांची आतषबाजी केली.

यावेळी शहर कॉँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, सुरेश हसापुरे, तालुकाध्यक्ष हरिष पाटील, माजी नगरसेवक विनोद भोसे, बाबा मिस्त्री, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, माजी महापौर सुशिला आबुटे, संजय हेमगड्डी, फिरदोस पटेल, अंबादास करगुळे, वैष्णवी करगुळे, अनुराधा काटकर, प्रवीण निकाळजे, तौफिक हत्तुरे, युवराज जाधव, सुनील रसाळे, महिला अध्यक्षा हेमा चिंचोळकर, वाहिद विजापुरे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुला-मुलींनी केले मातृ-पितृ पूजन

✔ सुराज्य/सोलापूर

**विवेकानंद केंद्र कन्याकुमारी सोलापूर व जुळे सोलापूर शाखेने आयोजिलेल्या व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात (वासंतिक शिबिर) रविवारी १०५ मुलामुलींनी मातृ - पितृ पूजन केले. यात सहावी ते नववीच्या मुलामुलींचा समावेश होता.**




मुलामुलींनी माता - पिता यांची पाद्यपूजा केली. तर माता - पिता यांनी मुलामुलींना रक्षासूत्र बांधून त्यांचे औक्षण केले. सचिन सवाई यांनी याचे पौरोहित्य केले. विवेकानंद केंद्राच्या अमृत परिवार नगरप्रमुख यांनी अमृत परिवार संकल्पना मांडली. पालकांसह पाल्यांनी भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पार्पण केले. दरम्यान, सकाळी शिबिरार्थींनी सामुदायिक २४ सूर्यनमस्कार घालून सूर्यनारायणाला अर्घ्य दिले. तसेच १० मे रोजी सुरू झालेल्या या पाचदिवसीय व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचा समारोप झाला.

विवेकानंद केंद्र निरोगी समाज निर्मितीचे कार्य करत असल्याचे सांगून जय अॅक्डमीचे संचालक रतनलाल अगरवाल म्हणाले, मातृ - पितृ पूजन हा आमचा संस्कार आहे. आपल्याला संस्कार, मूल्ये आणि भारतीयता जपायची आहे. यासाठी संस्कार गरजेचे आहेत. समाजाच्या याविषयक गरजा पूर्ण करण्याचे कार्य विवेकानंद केंद्र करत आहे. आपला पाल्य डॉक्टर, इंजिनिअर बनावा, ही आपली अपेक्षा आहे. मात्र, त्यासोबत तो समाजासाठी काही वेगळे करू शकेल का, आपण जीवनात काय मिळवायचे याचा पालकांनी विचार करण्याची आवश्यकता आहे.

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य शंकर नवले म्हणाले, सुदृढ समाजाच्या निर्मितीसाठी सुदृढ शरीर, मन व विचाराच्या व्यक्ती आणि कुटुंब निर्माणाची आवश्यकता आहे. त्यासाठी पालकांसह पाल्यांनी समाजासाठी योगदान देण्याची गरज आहे. विवेकानंद केंद्राचे सोलापूर नगर संचालक दीपक पाटील यांनी पुस्तक भेट देऊन पाहुण्यांचा सत्कार केला. यावेळी शिवस्मारकचे प्रमुख रंगनाथ बंकापूर यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिर प्रमुख समृद्धी गवंडी हिने शिबिराचा अहवाल मांडला. गुरुराज देशपांडे यांनी विवेकानंद केंद्र वयम् प्रकल्पाच्या कार्याची माहिती दिली. सोलापूर नगर प्रमुख विधिज्ञ विकास कुलकर्णी यांनी आवाहन केले. अक्षय बारंगुळे यांनी सूत्रसंचालन केले. केंद्र प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

३१ वा स्मृतीदिन



स्व. परमेश्वर (पमा) लिंगप्पा कोळी
* मृत्यू : दि. १५/०५/१९९२ *
तुमचा सहवास आणि मार्गदर्शन
आमच्या जीवनाची झालर होती,
आमच्या जीवनात तुमची साथ..
आम्हाला हवी होती !
भावपूर्ण श्रध्दांजली
पुष्कर - सागर
कार्तिकी - वर्षा - वैष्णवी
कोळी परिवार, सोलापूर

# खर्चात कपात करुन शेती करणे काळाची गरज

सुराज्य/अक्कलकोट

*सध्या बदलत्या हवामानानुसार शेतकऱ्यांना शेती करणे कठीण झाले आहे.कारण आज ही बहुसंख्य शेतकरी पारंपरिक पध्दतीने शेती करताना दिसतात.यामुळेच सहजिकच अनेक शेतकरी शेती व्यवसायात अडचणीत येताना दिसतात.अशा शेतकऱ्यांच्या शेतातील उत्पादन खर्च अधिक तर उत्पन्न मात्र कमी मिळत असल्याने बरेच शेतकरी शेती व्यवसायावर नाखूष असल्याचे दिसतात.सध्या खर्चात कपात करुन शेती करणे ही काळाची गरज बनली आहे.*



पारंपरिक शेती पध्दतीत बदल करुन नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेतीमधील उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादन वाढण्यास मदत होईल.
– **रामचंद्र माळी,**
तालुका कृषि अधिकारी अक्कलकोट.

शेती खर्चात बचत करण्यासाठी प्रथमता पारंपरिक शेती पध्दतीला फाटा देणे गरजेचे आहे.त्याच बरोबर आधुनिक तंत्राचा अवलंब करुन उपलब्ध साधनांचा व्यवस्थित व काटकसरीने वापर केल्यास नक्कीच तोट्यातील शेती व्यवसाय फायदेशीर ठरण्यास मदत होणार आहे.

पूर्वीच्या काळी असे म्हटले जायचे की उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी. पण, आज हे चित्र पूर्णतः बदललेले दिसून येते. कारण, हवामान बदल व त्याचा उत्पादकतेवर होणार परिणाम, कीड व रोगराईचा हल्ला, जमिनीची कमी होत जाणारी सुपिकता, मजुरांची उपलब्धता आणि मजुरीवरील खर्च या सर्व बाबींमुळे शेती व्यवसाय सध्या अडचणीत येताना दिसते.शेती व्यवसाय फायद्याची करायची झाल्यास अथवा शेती व्यवसायात नफा कमवायचा झाल्यास दोनच पर्याय आपल्या समोर उभे राहतात. एक तर उत्पन्नात वाढ झाली पाहिजे किंवा खर्चात घट झाली पाहिजे. उत्पन्नात वाढ होणे बऱ्याच अंशी पाउस व हवामान यांच्यावर अवलंबून असते. जर उत्पन्नात वाढ झाली तरी उत्पादनास जर व्यवस्थित भाव नाही भेटला तर नफा कमविणे निव्वळ अशक्य आहे. मग, एकच पर्याय आपल्यासमोर उभा राहतो आणि तो म्हणजे शेती व्यवसायातील खर्चात कपात करणे.खर्चात कपात करण्यासाठी

### शे ती वि ष य क

जर आपण आधुनिक तंत्राचा अवलंब करुन उपलब्ध साधनांचा व्यवस्थित व काटकसरीने वापर केल्यास नक्कीच शेती व्यवसायात बदल घडण्यास मदत होणार आहे. सुरुवातीस तंत्रज्ञाने वापरतांना खर्च काहीसा अधिक होऊ शकतो, पण मग नंतर मात्र वर्षानुवर्षे आपण या तंत्रज्ञानांचा उपयोग करुन शेती व्यवसायातील बरेचसे खर्च वाचवू शकतो, आणि उत्पादन खर्च कमी करू शकतो.अशी तंत्रज्ञाने कशी निवडता येतील ? कुठे भेटतील ? कशी वापरावीत ? याचे ज्ञान मात्र आपल्याला असणे गरजेचे आहे. जेणेकरून आपण आज तोट्यात चालणारा शेती व्यवसाय फायद्यात आणू शकतो. तंत्रज्ञाने निवडतांना त्यावर कमीत कमी खर्च करून जास्तीत जास्त कामे कसे करून घेता येईल यावरही भर द्यावा लागेल. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व योग्य प्रमाणात वापर करावयाचा असेल तर आपण सूक्ष्म सिंचन पद्धती वापरणे जरुरी आहे.आता ठिबक सिंचन, तुषार सिंचन सारखे तंत्रज्ञानाचा वापर शेतीत करणे गरजेचे आहे.याच बरोबर खतांवरील खर्च कमी करण्यासाठी आपण ठिबकद्वारे खते देण्याचे तंत्र फर्टिगेशन ' वापरू शकतो, जमिनीतून बाष्पीभवनामुळे होणारा पाण्याचा ऱ्हास कमी करण्यासाठी आपण प्लास्टिक मल्चिंग चा वापर करू शकतो, मल्चिंग मुळे तणांची अनावश्यक वाढ थांबून खुरपणीचा खर्च ही थांबेल.यासर्व नवनवीन तंत्रज्ञान विषयी शेतकर्यांना माहिती देऊन शेती व्यवसायात बदल घडवून आणल्यास नक्कीच खर्चात कपात करुन शेती करणे शक्य होईल.कमी वेळेत, कमी मजुरांमध्ये आणि कमी खर्चात शेतीची वेगवेगळी अनेक कामे कसे करता येईल याचे विचार करुन शेतीत नवनवीन उपकरणे वापरुन शेती केल्यास नक्कीच शेती फायद्याची ठरेल. पिकांची कापणी करण्यासाठी असे अनेक नवनवीन उपकरणे कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना सवलतीवर मिळत असतात. अशा तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केल्यास शेती व्यवसाय फायदेशीर ठरेल.याच बरोबर आज अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळताना दिसतात. त्याकरिता त्यांना सेंद्रिय निविदा वापरणे गरजेचे आहे.



## शिक्षण क्षेत्रात चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहू : साठे

**उ. सोलापूर** : कोंडी येथील गणेश नीळ ह्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भरीव योगदान दिल आहे. त्यांना मिळालेला पुरस्कार योग्यच आहे असे प्राध्यापक सखाराम साठे ह्यांनी सावळेश्वर येथे जानता राजा बहु उद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ कोंडीचे संष्थापक अध्यक्ष गणेश निळ यांच्या सत्कार प्रसंगी व्यक्त केलं आहे. कोल्हापुर येथे शेक्षणीक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल बद्दल शैक्षणीक पुरस्कार देऊन गौरविन्यात आले होते, सामान्य शेतकरयांचा मुलाने शेतकरी, कामगार व सर्व सामान्यांच्या मूला मुलींसाठी कोंडीच्या माळरानावर शिक्षण संकुल उभे केलं, उच्च दर्जाचे शिक्षण देन्याचे पवित्र कार्य गणेश निळ करीत आहेत. त्यांच्या कामासाठी सतत आम्ही त्यांच्या पाठीशी राहू, शिक्षण क्षेत्राला व संस्थेच्या प्रगतीसाठी आम्ही त्याच्या पाठीशी उभे राहु.यावेळी शिक्षणमहर्षी डां पंजाबराव देशमुख शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष जिवन यादव, लक्ष्मण वाघमोडे, प्रा. संजय जाधव, लक्ष्मण केत, सुषमा निळ, सिताराम गुंड, कैलास टेकाळे, धनाजी देविदास गावडे, संस्कार गिराम, संकेत मोरे, आसमा सय्यद, अर्चना औरादे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन मिरा माने, आभार वैभव मसलकर यांनी मानले.

## कर्नाटकात पंतप्रधान नरेंद्र मोदी व शहा यांचा पराभव : ॲड. रुपनवर



**नातेपुते** : ईडी व सीबीआयचा जास्त वापर केला. त्याला जनतेने न घाबरता प्रत्युत्तर दिले. मोदी व शहा यांना जनतेने ठोकरले. संपूर्ण देशात हीच परीस्थिती पहायला मिळेल. राहुल गांधींचे घर काढून घेण्याचा प्रकार घडला. भाजप विरोधात जनतेच्या मनात राग होता. तो राग कॉगेसला मतदान करून काढला व काँग्रेस पक्षाला न्याय दिला. कर्नाटकातील भाजपचा पराजय म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शहाचा पराभव असल्याचे विधान परिषदेचे माजी आमदार ॲड. रामहरी रुपनवर यांनी व्यक्त करून विजयाचा आनंद साजरा केला.

ॲड. रामहरी रुपनवर म्हणाले मागील सार्वत्रिक निवडणूकीत कर्नाटक विधानसभेत काँग्रेसचीच सत्ता आली होती. परंतु भाजपने मोडतोड करुन सत्ता स्थापन केली. लोकांचा विश्वासघात केला. यावर्षी पुन्हा नव्या उमेदीने जनतेने काँग्रेसला बहुमत दिले भाजपने जनतेचा विश्वासघात केल्याने भाजपला त्यांची जागा जनतेने दाखवून दिली असून यातच मोठा काँग्रेसचा विजय आहे



## सांगोल्यात काँग्रेस कार्यकर्त्यांचा जल्लोष

**सांगोला** : कर्नाटक काँग्रेसने मिळवलेल्या विजयाबद्दल सांगोल्यात जल्लोष करण्यात आला यावेळी प्रांतिक सदस्य महाराष्ट्र काँग्रेस कमिटी पी सी झपके सर मा तालुका अध्यक्ष सुनील भोरे जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष हरिभाऊ पाटील महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष सुमित्रा ताई लोहार जिल्हा उपाध्यक्ष राजकुमार पवार विजय वाघमारे युवक काँग्रेसचे अजित चव्हाण इतरओबीसी अध्यक्ष सिद्धेश्वर काळे फिरोज मनेरी दत्तात्रय देशमुख सोशल मीडिया प्रमुख प्रसाद खडतरे प्रशांत रायपुरे सुरेश डांगे विलासराव पाटील सर इतर कार्यकर्ते व पदाधिकारी जल्लोष करताना उपस्थित होते

## प्रा. राजकुमार पवार यांना डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएच.डी.

**मंगळवेढा** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाने श्री संत दामाजी महाविदयालयातील मराठीचे प्रा.राजकुमार श्रीधर पवार यांना विदयावाचस्पती(पीएच.डी.)ही पदवी जाहिर केली आहे.प्रा.राजकुमार पवार यांनी निवडक मराठी साहित्यातून चित्रित झालेल्या दुर्गदर्शनाचा चिकित्सक अभ्यास या विषयावर विदयापीठाकडे प्रबंध सादर केला होता. त्यांना तुळजाभवानी महाविदयालय तुळजापूरचे डॉ.शिवाजीराव देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल रतनचंद शहा सहकारी बँकेचे चेअरमन राहुल शहा, विदया विकास मंडळाचे उपाध्यक्ष बाबासाहेब पाटील, सचिव किसनराव गवळी,ॲड.रमेश जोशी,सोलापूर विदयापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तथा संत दामाजी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. एन.बी.पवार,उपप्राचार्य प्रा.सदाशिव कोकरे,मराठी विभाग प्रमुख डॉ.औदुंबर जाधव आदींनी अभिनंदन केले.

## आज छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करियर मार्गदर्शन

सुराज्य/सोलापूर

कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने सोमवार, दि. १५ मे रोजी छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करियर व मार्गदर्शन शिबिरआयोजित करण्यात आले आहे. गंगा लॉन्स विजापूर रोड सोलापूर येथे सकाळी १०.३० ते सायं ५ या वेळेत शिबिर होणार असून, शिबिराचे उदघाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे.


या शिबिरामध्ये विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व विद्यालयीन अभ्यासक्रम / प्रवेश प्रक्रिया / कलमापन चाचणी /शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना विषयक माहिती / करियर प्रदर्शन याबाबत मार्गदर्शन व उपयुक्त माहिती मिळणार आहे.

तरी सदर मेळाव्याचा विद्यार्थी व पालक वर्ग यांनी सहभाग नोंदवून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एस. आर. भालचिम व औद्योगिक प्रशिक्षण संस्था विजापूर रोड सोलापूरचे प्राचार्य एम. एस. उडाणशिवे यांनी केले आहे.

## परीट समाजाच्या मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करणार

सुराज्य/द. सोलापूर

### शिवसेना जिल्हा उपप्रमुख अण्णाप्पा सतुबर यांची ग्वाही



सोलापूर शहर व जिल्हा परीट समाज संघटना, महिला संघटना यांच्यावतीने शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख ( शिंदे गट) अण्णाप्पा सातुबर यांचा नागरी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी परीट समाजाच्या मागण्या शासन स्तरावर मांडून सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यावेळी सांगितले.

यावेळी बोलताना जिल्हा उपप्रमुख अण्णाप्पा सतुबर म्हणाले, परीट समाजाच्या ज्या काही अडचणी समस्या असतील त्या सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असून आगामी काळामध्ये परीट समाजाच्या उद्योगासाठी आर्थिक सहाय्य, बहुद्देशीय सभागृह, मुलांसाठी वसतिगृह,महिलांसाठी उद्योग असे अनेक उद्योग स्थापन करण्यासाठी आपण शासन स्तरावर पाठपुरावा करणार आहोत. शहरात संत गाडगेबाबा चौक असे नाव देण्यासाठी मागणी करण्यात आली.

याबाबत पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन यावेळी दिले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संपर्कप्रमुख शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, शहर प्रमुख मनोजभाई शेजवाल यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी समाजाच्या मागण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

याप्रसंगी शहर महिला अध्यक्षा महादेवी घोडके, शहराध्यक्ष विनोद भोसले, शहर युवक अध्यक्ष दत्तात्रय दळवी, शिवानंद शिंदे, नागेश काटकर, महेश वाघमारे, संदीप भोसले, मंगेश पाटोळे, राहुल गायकवाड, गणेश वारे, मनोज पंदारकर यांच्यासह वरील समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## वडगाव येथील जळीतग्रस्त कुटुंबाला एम. के. फाउंडेशनच्यावतीने मदत

सुराज्य/अक्कलकोट

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडगाव येथील नागनाथ हुळळे यांच्या घराला अचानक झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे आग लागून मोठे नुकसान झाले. घरातील संपूर्ण वस्तू व अनेक किमती वस्तू भस्मसात झाल्या. दरम्यान एम के फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे हे दुबई दौऱ्यावर असताना याची माहिती समजताच दुबई वरून परत आल्यानंतर मदतीचे आश्वासन दिले होते. एम.के.फाउंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे यांनी या कुटुंबास रविवारी फाउंडेशनच्या वतीने संसार उपयोगी साहित्यांची मदत केली. आतापर्यंत फाउंडेशन च्या वतीने अनेक जळीत कुटुंबास मदत करण्यात आली आहे.

दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होऊन त्यातून त्यांना सावरण्यासाठी व सामाजिक बांधिलकी च्या दृष्टीने जळीतग्रस्त कुटुंबाच्या वेदना कमी करण्याचा प्रयत्न एम के फाउंडेशन च्या माध्यमातुन ते करत आहेत. संपूर्ण घर आणि संसार उद्धस्त झालेलं असतं, संसार पुन्हा उभ करण्याच आव्हान कुटुंबासमोर असते. अश्या अडचणीत असणाऱ्या जळीत कुटुंबाच्या मदतीला जाण्यासाठी फाउंडेशन नेहमी तत्पर असते असे मनोगत एम के फाउंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे यांनी व्यक्त केले.

यावेळी दींडुर मठाचे बसवलिंगेश्वर महाराज, काशिनाथ बिराजदार, अंबणा रामपुरे, लिंगराज हुल्ले, अभय नेलुरे, मल्लेशी मंदोली, इसाक अत्तार, उमेश मेंदर्गी, महांतेश बगले, अजित पाटील, मल्लिकार्जुन बगले, प्रशांत बिराजदार, सतिश नेलूरे, श्रीशैल हुल्ले, कुमार जवळगे, धनराज हुल्ले, संगप्पा बिराजदार यांच्यासह हळळे परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## कार- रिक्षाचा भीषण अपघात; तिघेजण जखमी

सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट येथील महालक्ष्मी मंदिराच्या समोर शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास कार आणि रिक्षाचा भीषण अपघात झाला. कार चालकाने भरधाव वेगाने पाठीमागून येऊन रिक्षाला धडक दिली.

यात रिक्षामधील तिघेजण जखमी झाले आहेत.यात एका लहान मुलाचा समावेश आहे. शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास वसंत बिराजदार (वय-३७,रा.किसन नगर,अक्कलकोट रोड) हे रिक्षा घेऊन जात होते. तेव्हा रिक्षामध्ये तीन ते चार प्रवासी होते.त्यावेळी पाठीमागून येणाऱ्या एका कारने रिक्षाला जोरदार धडक दिली.या अपघातात वसंत हे गंभीर जखमी झाले. शिवाय रिक्षा मधील धनराज धनशेट्टी (वय-१५,रा.दत्त नगर) या मुलालाही डोक्याला जखम झाली आहे.अन्य प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली.

हा अपघात इतका भीषण होता की यात रिक्षा पलटी झाली. अपघातानंतर कार चालक पळून गेला.अपघाताची माहिती मिळतात वाहतूक पोलीस हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात पाठविले शिवाय मार्ग करून दिला. या घटनेची नोंद सिविल पोलीस चौकी झाली आहे.

## दुचाकी काढण्यावरून तरुणास मारहाण करत तलवारीने हल्ला

सुराज्य/सोलापूर

दुचाकिच्या शेजारी लावलेली दुचाकी काढण्यास सांगितल्याच्या वादातून तरुणाला मारहाण करत त्याच्या पुतण्यावर तलवारीने हल्ला केल्याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत रवि सुभाष काकडे (वय-३६,रा.भिम विजय चौक, न्यू बुधवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी काकडे हे भिम विजय चौक येथील एका दुकानासमोर लावलेली दुचाकी काढत होते. तेव्हा आरोपींची सौदागर क्षीरसागर याची गाडी फिर्यादीच्या गाडीच्या जवळ लावलेली होती. तेव्हा ती गाडी काढ असे म्हणल्याने आरोपी क्षीरसागर याने तुला खूप गडबड झाली आहे का, असे म्हणत त्यांना मारहाण केली. शिवाय आपल्या कारमधून लोखंडी पाना काढून फिर्यादीच्या डोक्यात मारले. यावेळी आरोपी सतीश क्षीरसागर याने रॉडने मारहाण केली.यावेळी फिर्यादीने या घटनेची माहिती कुटुंबियांना कळवली. त्यावेळी कुटुंबीय हे घटनास्थळी येऊन आरोपीला विचारणा करताना त्यांनाही आरोपींच्या इतर सहकार्यांनी मारहाण केली. शिवाय फिर्यादीच्या पत्नी व बहिणीलाही आरोपींनी मारहाण केली.तसेच फिर्यादीचा पुतण्याला आरोपी सतीश क्षीरसागर याने तलवारीने कानाजवळ मारून जखमी केले. तसेच पोलिस ठाण्यात तक्रार दिली तर जीव मारून टाकतो अशी धमकी आरोपी रोहित क्षीरसागर,लक्ष्मी क्षीरसागर यांनी दिली. अशा आशयाची फिर्याद रवि काकडे यांनी दिली आहे.या प्रकरणी सौदागर क्षीरसागर, सतीश क्षीरसागर, रोहित क्षीरसागर, लक्ष्मी क्षीरसागर, रोहन चौगुले व एक अनोळखी इसम यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोसई ताकभाते करत आहे.

## चोरट्याने घरासमोरून दुचाकी पळवली


घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीयू.१६१५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना २० एप्रिल रोजी रात्री अशोक चौक येथे घडली.याप्रकरणी मनोहर नारायण कुरापाटी (वय-५८,रा.अशोक चौक) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार किवडे हे करीत आहेत.

## नवीन ट्रॅक्टर घेण्यासाठी सात लाख रुपये आण म्हणत विवाहितेचा छळ; पतीसह सासूवर गुन्हा

**सोलापूर** : फिर्यादी नंदिनी अमोल हिरडे (वय-२१,रा.मुपो. घायपातवाडी.जि.अमहनगर) यांना वेळोवेळी शारीरिक मानसिक त्रास देऊन लाथा बुक्क्यांनी मारहाण करत माहेरुन शेतीच्या कामासाठी नवीन ट्रॅक्टर घेण्यासाठी सात लाख रुपये घेऊन ये असे म्हणत छळ केला.त्यानंतर तुझ्या आई-वडिलांनी आम्हाला लग्नात आमचा मान पान केला नाही व जास्त हुंडा दिला नाही असे म्हणून शिवीगाळ करून दमदाटी केली असल्याची फिर्याद नंदिनी हिरडे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती अमोल हिरडे व सासू सिंधू हिरडे (रा.मुपो. घायपातवाडी.जि.अमहनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना २१ मे २०२२ ते ६ मार्च २०२३ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार नवले हे करीत आहेत.

# दुधाला उसाप्रमाणे 'एफआरपी'लागू करा : शेतकऱ्यांची मागणी

सुराज्य/सोलापूर



### दूध उत्पादकांच्या मागण्या

- खासगी, सहकारी दूध संस्थांचे ऑडिट करा.
- दुग्ध व्यवसायासाठी लूटमार विरोधी कायदा' करा.
- एफआरपी लागू करा.
- रेवेन्यू शेअरिंग'चा फॉर्मुला लागू करा.
- भेसळयुक्त दूध निर्मितीवर बंदी आणा .

दूध व्यवसाय शेतकऱ्यांची होणारी लूटमार थांबवा आणि दुधाला उसाप्रमाणे एफआरपी लागू करा, यासह पशुखाद्याचे दर नियंत्रणात आणून दूध उत्पादकांना न्याय द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

मागील दोन वर्षापूर्वी कोरोनाचे दुसरे लॉकडाऊन सुरु झाले आणि मागणी घटल्याचे कारण देत दूध कंपनीकडून दुधाचे दर कमी करण्यात आले. पहिल्या लॉकडाऊनमध्ये बसलेल्या आर्थिक फटक्यातून सावरू न शकलेला दूध उत्पादक शेतकरी या दुसऱ्या आघाताने पुरता कोलमडून गेला. लॉकडाउनची कारणे सांगून कमी करण्यात आलेला दर लॉकडाउन शिथिल झाल्यावर मागील दोन महिन्यापुर्वी वाढविण्यात आले .परंतु मागील आठवड्यात कोणतेही सबळकारणा नसताना दुध संघांनी मनमानी करीत गायीच्या दुधाचा दर ४० रूपयावर असणारा दर ३४ रूपयावर आणला आहे.दुध संघाकडून शेतकऱ्यांना कमी भाव देऊन ग्राहकांना मात्र त्याच दराने दूध विक्री करत आहेत, असे चित्र निर्माण झाले आहे.या खाजगी दुध संघावर सरकारने तात्काळ नियंत्रण आणून न्याय द्यावा अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे.

**लुटमार विरोधी कायदा करा.**

लूटमार विरोधी कायदा नसल्यामुळे खासगी व सहकारी संघ हे सरकारने ठरवून दिलेल्या भावापेक्षाही खालच्या दराने दूध दर देत आहेत. सरकार कडेही दूध संकलन करण्याची पर्यायी व्यवस्था नाही. त्यामुळे केवळ नोटिसा पाठवण्या पलीकडे ते काही करत नाही. राज्यात भेसळयुक्त दूध बनवले जाते. यामुळे शेतकऱ्यांकडून घेतलेले शुद्ध दूध बेचव बनते. त्यामुळे दुधाची मागणी घटते. भेसळयुक्त दुधावर बंदी आणण्यासाठी कडक पाऊले उचलले पाहिजेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

## • निधनवृत्त...

### भक्तप्रल्हाद बिराजदार



**द. सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील रहिवासी भक्तप्रल्हाद धर्मांना बिराजदार हे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा सून व दोन नातवंडे असा परिवार आहे.

### पाडुरंग मेंगजी



**सोलापूर** : सोमवार पेठ येथील राजेंद्र क्लाथ स्टोअर्सचे मालक पाडुरंग विष्णूसा मेंगजी वय ६०,यांचे अकस्मात आज सकाळी १० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा,सून आहेत.

### दिगंबर सरवदे



**अकलूज** : लवंग ता माळशिरस येथील दिगंबर आबा सरवदे यांचे वयाच्या ९०व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पाशात पाच विवाहित मुले, तीन विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार असून लवंग गावच्या सरपंच सौ योगिता सरवदे यांचे ते सासरे होते

# माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी प्रचार केलेल्या मतदारसंघात काँग्रेसचे ५ उमेदवार विजयी

सुराज्य/अक्कलकोट

*माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी प्रचार केलेल्या मतदार संघात काँग्रेसचे तब्बल ५ आमदार विजयी झाले. निकालानंतर काँग्रेस कार्यकत्यांमध्ये उत्साह संचारला आहे.*



माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे–आठ दिवस कर्नाटक येथे प्रचार केला. काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले. या निकालाचा परिणाम महाराष्ट्रातही होईल.महाराष्ट्रातही कर्नाटक सारखीच परिस्थिती असल्याने येथील भाजपाची सत्ता जाईल.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या प्रचारात जी चुरस दिसली, ती निकालात मात्र गायब झाली. या निवडणुकीत काँग्रेसने स्पष्ट बहुमत मिळवित कर्नाटक विधानसभेवर तिरंगा झेंडा फडकविला. कर्नाटक राज्याच्या सीमेलगतच असलेल्या अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी इंडी, अफजलपूर, आळंद, गुलबर्गा आणि बबलेश्वर या मतदारसंघात जोरदार प्रचार केला. २ मे ते १० मे असे सलग आठ दिवस माजी मंत्री म्हेत्रे प्रचारात व्यस्त होते. त्यांनी पाचही मतदारसंघात सभा, कॉर्नर बैठका आणि वैयक्तिक गाठीभेटीवर भर दिला. म्हेत्रे यांनी प्रचार केलेल्या या इंडी मतदारसंघात काँग्रेसचे यशवंत गौडा-पाटील आळंद मतदारसंघातून बी. आर. पाटील, अफजलपूर मतदारसंघातून एम. वाय. पाटील, बबलेश्वर मतदारसंघातून एम. बी. पाटील, गुलबर्गा उत्तर मतदारसंघातून कनिज फातिमा आणि गुलबर्गा दक्षिण मतदारसंघातून अल्लम प्रभू हे पाचही आमदार नव्याने निवडून आले आहेत. प्रचारासाठी गुलबर्गा आणि विजयपूर दोन जिल्हे दिले होते. विद्यमान चार आमदार पद राखत अल्लमप्रभु यांना निवडुन आणण्यात म्हेत्रे यांनी महत्त्वाची भुमिका बजावली. त्यामुळे त्यांचे अभिनंदन होत आहे.

पुढे बोलताना म्हेत्रे म्हणाले कर्नाटकातील निकालाचा शंभर टक्के महाराष्ट्रातील निवडणुकीवर परिणाम होईल. लोकांना कळुन चुकले. व्यापारी टॅक्समुळे नाराज होते.

काँग्रेसने निवडणुक काळात महिलांना बस मोफत, २०० युनिट पर्यंत वीज मोफत, सुशिक्षित पदवीधर व डिप्लोमा धारकांना मानधन, १० किलो मोफत धान्य, कर्ते महिलांना दोन हजार मानधन या पाच आश्वासनाचा फायदा काँग्रेस ला झाला. जातीवर व धर्मावर बोलायचे पण विकासकामाबाबत भाजपा बोलायला तयार नव्हती. तसेच विकास कामातील भ्रष्टाचार व कमिशन मुळे जनतेने भाजपाला नाकारले.

## देशभक्त निर्माण करणे एनसीसीमुळे शक्य : गजराज

सुराज्य/सांगोला



महाराष्ट्र बटालियन एनसीसी सोलापूर यांच्या विद्यमाने जिल्ह्यातील बार्शी कुर्डूवाडी सोलापूर अक्कलकोट पंढरपूर करमाळा मंगळवेढा माळशिरस या भागातील एनसीसी विद्यार्थ्यांसाठी कॅम्पचे आयोजन केले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच आदर्श देशभक्त निर्माण करणे एनसीसीमुळे शक्य असल्याचे कर्नल राजेश गजराज यांनी विचार व्यक्त केले..

कोळे ता सांगोला येथे डॉ. पतंगराव कदम शिक्षण संस्था संचलित दीपक आबा साळुंखे महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक सर्वसाधारण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी कमांडींग ऑफिसर म्हणून राजेश गजराज बोलत होते. यावेळी कर्नल विक्रम जाधव प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी बोलताना सहाय्यक अधिकारी कर्नल विक्रम जाधव यांनी देशातील प्रत्येक पिढीने शिस्त पाळली पाहिजे, असे सांगून एनसीसीद्वारे विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य दलात अधिकारी पदापर्यंत पोहोचण्याची संधी मिळते त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.शिबिरासाठी कमांडींग ऑफिसर कर्नल राजेश गजराज, सहाय्यक अधिकारी कर्नल विक्रम जाधव, सुभेदार मेजर अरुणकुमार ठाकूर, सुभेदार प्रेमानंद एनसीसी अधिकारी लेप्टनंट सुल्ताना पठाण, कॅप्टन भीमाशंकर व्हनमाने सुभेदार ठाकूर, सुभेदार रामचंद्र, हवालदार नानासाहेब साठे, हवालदार दीपक पाटील यांच्यासह १३ निर्देशक प्रामुख्याने उपस्थित होते. शिबीर यशस्वी होण्यासाठी डॉ. पतंगराव कदम शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक माने, सचिव अमोल माने, संचालक शरद माने यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचारी संपूर्ण सहकार्य करत आहेत. तरुणांना चांगली संधी उपलब्ध कोळ्यासारख्या ग्रामीण भागात जिल्हा स्तरावरील एनसीसी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरामुळे ग्रामीण भागातील सैन्य दलात जाऊ इच्छिणाऱ्या तरुणांना सैनिकी जीवनाचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळणार आहे, दहा दिवसांच्या या शिबिरात एनसीसीमधील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या शस्त्रांची माहिती, युद्धकला, नेमबाजी, परेड आदी प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



## जिजामाता विकास पॅनलचे सर्व उमेदवार मताधिक्क्याने विजयी

**मंगळवेढा** : जिजामाता महिला नागरी बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक निवडणूकित जिजामाता विकास पॅनलचे ११ उमेदवार विजयी झाले.यापुर्वी पाच उमेदवार बिनविरोध झाले होते.तर सर्वसाधारण मतदार संघासाठी एका उमेदवाराने अर्ज भरल्याने निवडणूक लागली. या निवडणूकित जिजामाता विकास पॅनलचे सहाच्या सहा उमेदवार भरघोस मताधिक्क्यांनी निवडून आले.शनिवार दि.१३ मे रोजी सर्वसाधारण मतदार संघात पार पडलेल्या निवडणूकित जिजामाता विकास पॅनलचे सहा उमेदवार मोठया फरकाने विजयी झाले.रिना गोपाळ भगरे १७३० मते,तेजस्विनी अजीत दत्तू १७२२ मते,मिना शिवाजी जावळे १७२० मते,साखराबाई रामचंद्र जाधव १७१३ मते,मंगल दामोदर मुदगूल १६९७ मते,आशा रामकृष्ण नागणे १६७६ मते मिळून विजयी झाल्या. यामध्ये रूपाली शिवाजी जाधव यांना ३६८ मते मिळाली.त्यामुळे त्यांचा पराभव झाला.सहा जागेसाठी केवळ एका उमेदवाराने उमेदवारी अर्ज भरल्याने निवडणूक घेण्यात आली.यापुर्वी महिला प्रतिनिधी गटातून मालन शिवाजी सोमदळे,रंजना निवृत्ती जगदाळे,अनुसूचित जाती जमाती गटातून कमल रामचंद्र गवळी, इतर मागास प्रवर्ग मतदार संघातून सत्यभामा ज्ञानेश्वर भिमदे, विमुक्त जाती भटक्या जमाती विमाप्र मतदार संघातून जयश्री मोहन मेटकरी आदी उमेदवार बिनविरोध झाले आहेत.शनिवारी ही निवडणूक इंग्लिश स्कूल,मंगळवेढा येथे पार पडली. निवडणूकीच्या मतमोजणीला लगेचच सुरुवात झाली.या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पी.सी.दुरगुडे यांनी काम पाहिले.यावेळी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



## मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटीतर्फे दामाजी चौक येथे जल्लोष

**मंगळवेढा** : कर्नाटक राज्यामध्ये काँग्रेस पक्षाच्या १३५ पेक्षा जास्त जागा निवडून आल्याबद्दल मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटी च्या वतीने दामाजी चौक येथे जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी संत दामाजी पंत च्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विजय साजरा करण्यात आला.यावेळी काँग्रेस चे अध्यक्ष ड नंदकुमार पवार व प्रशांत साळे राष्ट्रवादी चे अध्यक्ष चंद्रशेखर कोंडूभैरी मतदार संघाचे अध्यक्ष मारुती बापू वाकडे जिल्हा उपाध्यक्ष दादासो पवार जिल्हा सरचिटणीस दिलीप जाधव व पांडुरंग जावळे ग्रामीण विकास तज्ञ दत्तात्रय खडतरे आ जा जमातीचे उपाध्यक्ष नाथा आयवळे तालुका सरचिटणीस आबा भोसले समीर इनामदार तस्लिम अकूंजी संदीप पवार आदी उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमीत्त छावा प्रतिष्ठानच्यावतीने विविध कार्यक्रम

**बार्शी** : छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमीत्त येथील छावा प्रतिष्ठानच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १४ मे रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीस दुग्धाभिषेक व जलअभिषेक करण्यात येणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता पदयात्रा काढण्यात येणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी १५ मे रोजी सायंकाळी ६ वाजता शाहीर रामनंद उगले यांचा शाहिरी पोवाडा व महाराष्ट्राची लोकगाणी कार्यक्रम होणार आहे. छत्रपती संभाजी चौक जुनी वेस कसबा पेठ येथे हे कार्यक्रम होणार आहेत.

## सांगोल्यात काँग्रेस कार्यकर्त्यांचा जल्लोष

**सांगोला** : कर्नाटकात काँग्रेस पक्षाने विजय मिळवल्यानंतर सांगोल्यात काँग्रेस कार्यकर्त्यांनी या विजयाचा जल्लोष साजरा केला कर्नाटकाच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे सांगोला तालुका काँग्रेस कमिटी,महा विकास आघाडी यांच्या वतीने विजय उत्सव साजरा करण्यात आला. सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले , पंडित जवाहरलाल नेहरू, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला,


यावेळी सांगोला तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अभिषेक कांबळे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र कांबळे, महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष मैनाताई बनसोडे,भारत मोरे शिवसेना शहर प्रमुख कमरूद्दीन खतीब, रघुनाथ ऐवळे ,अजित गोडसे, नितीन चव्हाण, शिवसेना युवा नेते तुषार इंगळे, शिवसेना नेते गोरख येजगर,अमर साळुंखे, शेखर गडहिरे, अभिजीत कांबळे, सिद्धेश्वर देशमुख, इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मोडनिंब मध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात

**मोडनिंब** : मोडनिंब पतंजली योग समितीच्या वतीने संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहाने मोडनिंब येथे साजरी करण्यात आली.यावेळी भारतीय सैन्य दलाचे निव्रुत्त मेजर अजिनाथ नलवडे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीराजे यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.यावेळी जय भवानी, जय शिवराय, जय संभाजी अशा घोषनानी परिसर दणानुन गेला.संभाजी महाराज यांनी स्वराज्यासाठी निर्भयपणे आपले प्राण वेचले याचे स्मरण यावेळी करण्यात आले.या कार्यक्रमासाठी योगगुरू महेश पवार , निलेश गिद्दे, जयंत पाटील, के एस गायकवाड, प्रमोद माळी, नागनाथ सुर्वे, नागनाथ कोरडे, राहुल गांधी, सिद्धेश्वर लोंढे, क्षितिज शहा,प्रा. सुभाष रणदिवे, विकास शिंदे, सिद्धेश्वर दळवी,मनोज पवार,तानाजी इंगळे सर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहित पवार, राधेय पवार, रूद्र पवार यांनी परिश्रम घेतले .

## रिपाइंची क्रियाशील सभासद नोंदणी व्यापक झाली पाहिजे : कसबे

सुराज्य/वेळापूर



रिपब्लिकन पक्ष हा देशातील लढाऊ असा एकमेव पक्ष आहे. समाजातील सर्व स्तरातील आंबेडकर प्रेमी,आठवले प्रेमी सक्षम कार्यकर्त्यांची सक्रिय कार्यकर्ता म्हणून रिपाई मध्ये नोंदणी करून येत्या दि.२८ मे रोजी शिर्डी येथे होणाऱ्या महामेळाव्यास बहुसंख्येने हजर राहावे असे, आवाहन रिपाइं आठवले पक्ष निरीक्षक बाळासाहेब कसबे यांनी अकलूज येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले च्या कार्यकर्त्यांना केले.

यावेळी, बैठकीचे अध्यक्षस्थानी रिपाइं आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे होते. त्यांच्यासह विचार मंचावर पक्ष निरीक्षक आप्पासाहेब जाधव,दुसरे पक्ष निरीक्षक बाळासाहेब कसबे,प.महा. उपाध्यक्ष एन.के. साळवे,पश्चिम महाराष्ट्र सचिव,दयानंद धाईंजे,जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले जिल्हा

जिल्हा नेते,शामराव भोसले, जिल्हा नेते, तुकाराम बाबर, जिल्हा युवक, कार्याध्यक्ष किरण धाईंजे, जिल्हा नेते, एस. एम. गायकवाड, आबा बनसोडे, रमेश धाईंजे, ता. कार्याध्यक्ष समाधान भोसले, सरचिटणीस मारुती खांडेकर, ता. यु. अध्यक्ष- दशरथ नवगिरे, युवा कार्याध्यक्ष-विनोद रणदिवे, युवा सरचिटणीस प्रविण साळवे, युवक ता. उपाध्यक्ष बाबुराव भोसले, ता.उपाध्यक्ष, संजय भोसले, ता उपाध्यक्ष सुनील ओवाळ, ता. उपाध्यक्ष, संतोष कांबळे, ता. उपाध्यक्ष, शेखर सावंत ता. उपाध्यक्ष रामभाऊ कांबळे, ता सचिव राजरत्न नाईकनवरे, मारूती शिंदे, आदी तालुका कार्यकारणीतील सदस्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

बैठकीस रिपाइंचे भारकर बनसोडे,महेंद्र लोंढे,पोपट गेजगे,गणेश सावंत विश्वजित भालशंकर राजाभाऊ सुरवसे स्वप्निल सरवदे, महेंद्र भोसले, संतोष जगताप,रणजित सरवदे,प्रकाश कांबळे, दिपक दळवी,महादेव सावंत,बापु साळवे,अनिकेत भोसले,पंकज भोसले,दिलिप भोसले सद्दाम तांबोळी, नवनाथ माने, निलेश चंदनशिवे,रविंद्र कांबळे,किरण गायकवाड,संजय म.भोसले,अशोक(भोला)भोसले,भगवान भोसले महाळुंग, समाधान लांडगे, रावसाहेब भोसले,आकाश भोसले आदी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुर्डूवाडीतील अहिल्यादेवी होळकर पुतळा परिसराच्या सुशोभिकरणाची मागणी

सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डूवाडी शहरातील बालोद्यान परिसरात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर पुतळ्या परिसरात विविध विकास कामे नगरपरिषदेने सुशोभिकरण करावे या मागणीचे निवेदन मुख्याधिकारी व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांना कुर्डूवाडी शहर भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्षा प्रतिक्षा गोफणे यांनी दिली आहे.

मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन एक महिना उलटून गेला तरी कुर्डूवाडी नगरपरिषद प्रशासनाकडून,अद्यापपर्यंत कसलीही दखल घेतली नाही. अहिल्यादेवी होळकर यांच्या विषयी बहुजन समाजात असलेली आदरयुक्त भावना आणि प्रेरणा या सामाजिक जाणिवेतून भाजपा महिला आघाडीच्या वतीने, भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे सोलापूर येथे दि.१२ मे रोजी महाबैठकीसाठी आले असता त्यांना कुर्डूवाडी भाजपा महिला आघाडीच्या वतीने शहराध्यक्षा प्रतिक्षा गोफणे यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री. जिल्हाधिकारी, प्रांत कार्यालय , कुर्डूवाडी पोलिस स्टेशन यांना पाठवलेल्या आहेत.

यावेळी भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या सोलापूर ग्रामिण जिल्हाध्यक्ष धनश्री खटके-पाटील,अनु.जाती जमाती सेल जिल्हाध्यक्षा माया माने, युवती उपजिल्हाध्यक्ष निलोफर शेख या मान्यवर उपस्थित होत्या.

पुतळा परिसरात सुरक्षा रक्षक, लहान मुलांची खेळणी बसविणे, स्वतंत्र स्वच्छतागृह,संरक्षक भिंत, पुतळ्यासह चबुतरा मोठा करणे. या मागणीसाठी आम्ही ११ एप्रिल रोजी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले होते. २० मे पर्यंत विकासकामे न झाल्यास आम्ही दि.२३ मे रोजी कुर्डूवाडी नगरपरिषदेवर हलगी मोर्चा काढून निषेध व्यक्त करणार असल्याचे भाजपा महिला आघाडी शहराध्यक्षा प्रतिक्षा गोफणे यांनी सांगितले.

## मसाप मोडनिंब शाखेच्यावतीने व्याख्यानमाला

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा मोडनिंब यांच्या वतीने साहित्य संस्कृती व्याख्यानमाला आयोजित करण्यात आलेली आहे. रविवार दिनांक २१ मे ते २३ मे पर्यंत तीन दिवस दररोज सायंकाळी सात वाजता ही व्याख्यानमाला चालणार आहे. रविवारी दिनांक २१ मे रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे चे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांचे मानवी जीवनातील विनोदाचे स्थान या विषयावर व्याख्यान होणार आहे. सोमवारी दिनांक २२ मे रोजी जयवंत आवटे यांचे विनोदी कथाकथन होणार आहे, तर मंगळवारी २३ मे रोजी डॉ. संजय कळमकर यांचे जगण्यातील आनंदाच्या वाटा या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे.मोडनिंब आणि परिसरात या व्याख्यानमालेमुळे श्रोत्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

पूर्वी मोडनिंब येथे न.चि. केळकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी सात दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत होते. ती व्याख्यान माला पुढे बंद पडली. नंतर रोटरी क्लब व गोळवलकर कुटुंबियांनी ही व्याख्यानमाला सुरु केली पण त्यातही व्यत्यय येऊन बंद पडली होती. तीच मोडनिंबची व्याख्यानमालेची परंपरा, यंदा महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मोडनिंब शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानमालेमुळे पुन्हा सुरू होत आहे. असे म्न्याहणण्यास काही हरकत नसावी. जुन्या व्याख्यानमालेच्या गोड स्मृतींना यामुळे नक्की उजाळा मिळेल व मोडनिंब परिसरातील श्रोत्यांना वेगवेगळ्या विषयावर व्याख्यान ऐकण्याची नव्याने संधी मिळणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात होणाऱ्या या कार्यक्रमासाठी मोडनिंब परिसरातील सर्व श्रोत्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मोडनिंब शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

## तांदुळवाडी येथे १०१ जणांचे रक्तदान

सुराज्य/वेळापूर



तांदुळवाडी ग्रामपंचायत कार्यालय येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठान तांदुळवाडी व तांदुळवाडी ग्रामस्थ यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरात १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मेजर बाळासाहेब निलटे, मेजर सागर शिंदे, सिताराम राजगुडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक ॲड. विजय पवार, तांदुळवाडी ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक व माजी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य ॲड. नागेश काकडे, तांदुळवाडी उपसरपंच विकास चव्हाण ,हनुमान विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष शिवाजी दुधाळ, शिवनेरी रोपवाटिकेचे मालक ज्योतीराम जाधव, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत निलटे, ग्रामपंचायत सदस्य भीमाशंकर गुजरे, नवनाथ बांदल, रघुनाथ बांदल, बापू बाबर, अनिल शेळके ,अनिल चव्हाण, आर के पाटील, तेजस जाधव उपस्थित होते.

## अक्कलकोट पंचायत समिती येथे खरीप हंगाम पूर्व नियोजन आढावा बैठक

सुराज्य/अक्कलकोट

*अक्कलकोट पंचायत समिती येथे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय खरिप हंगाम पूर्व नियोजन आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी माजी सभापती महिबूब मुल्ला, माजी पंचायत समिती सदस्य राजकुमार बंदीछोडे, उपविभागीय कृषी अधिकारी जयंवत कवडे, पं. स. गटविकास अधिकारी सचिन खुडे, वीज वितरण विभागाचे उप अभियता संजयकुमार म्हेत्रे, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, पं.स. चे कृषी अधिकारी उमेश काटे, तालुका कृषी निविष्ठा विक्रेते संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब पाटील तसेच तालुक्यातील कृषी केंद्र विक्रेते, कृषी विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.*



यावेळी बोलताना आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले की,तालुका कृषि विभागाने विविध योजनांची परिणामकारकपणे अंमलबजावणी करुन सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देत खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना आवश्यक ती रासायनिक खते, युरिया व बी-बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्याची सुचना केली.यावेळी कृषी यांत्रिकीकरण योजनेतंर्गत महाडीबीटी द्वारे निवड झालेल्या लाभार्थ्यांना आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते ट्रॅक्टर व ट्रॅक्टरचलित अवजारांचे वाटप करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना अंतर्गत नवीन विहीरी च्या लाभार्थ्यांचा ही सन्मान करण्यात आला. तसेच कृषी विभागाच्या उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी यांनी सादरीकरणाद्वारे कृषी विभागामार्फत सन २०२२-२३ मध्ये राबविलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

तसेच सन २०२३-२४ मध्ये खरीप हंगाम करिता आवश्यक बियाणे व खते याबाबतची माहिती दिली. यावेळी कृषी विक्रेत्यांमार्फत अप्पासाहेब पाटील यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहायक आनंद कांबळे तर कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार उमेश काटे यांनी मानले.

# लोकसभा-विधानसभा एकत्रित लढविण्यावर जोर-बैठका!

## ‘सिल्व्हर ओक’ वर मविआचे नेते आले एकत्रित : उत्साही वातावरण

सुराज्य/मुंबई

**कर्नाटक विधानसभेतील काँग्रेसच्या घवघवीत यशानंतर आज रविवारी महाराष्ट्रात महाविकास आघाडीने नेते खा. शरद पवार यांच्या ‘सिल्व्हर ओक’ या निवासस्थानी एकत्रित आले तेही अगदी उत्साही वातावरणात. सर्वांच्याच चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता. कर्नाटकनंतर आता महाराष्ट्र काबीज करण्याचा निर्धार पक्का करीत या बैठकीत अत्यंय खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा झाली. यापुढे आगामी सर्व निवडणुका एकत्रित लढविण्यावर यावेळी साधकबाधक चर्चाही झाली.**



या बैठकीची माहिती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली. ते म्हणाले की. महाविकास आघाडीचे प्रमुख नेते, महाराष्ट्रातील इतर पक्ष आणि आमचे आघाडीचे घटक पक्ष एकत्र बसून लोकसभेच्या आणि विधानसभेच्या जागांच्या वाटपात बैठक बोलावून चर्चा करणार आहोत. या बैठकीतून अधिक चांगला समन्वय महाराष्ट्रातील जनतेपुढे ठेवून एक ठाम पर्याय जनतेला देण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी करणार असल्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा सत्तासंघर्षावरील निकाल आणि कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेले घवघवीत यश यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सिल्वर ओक येथील निवासस्थानी रविवारी झाली. या बैठकीनंतर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आणि शिवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली.

जयंत पाटील म्हणाले की, कर्नाटकमध्ये नुकत्याच ज्या निवडणूका झाल्या त्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा प्रचंड मोठा पराभव झाला आहे. आज महाविकास आघाडीची शरद पवार यांच्या सिल्वर ओकवर पार पडलेल्या बैठकीत कर्नाटक निवडणुकांचा आढावा घेण्यात आला.

या निवडणुकीत फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, वेगवेगळ्या एजन्सींचा गैरवापर आणि स्थानिक जनतेला आलेले त्या सरकारच्या अनुभवावर चर्चा करण्यात आली. महाविकास आघाडी म्हणून नुकत्याच झालेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचाही तिन्ही पक्षाच्या प्रमुखांनी बसून साधकबाधक चर्चा आजच्या बैठकीत झाली. त्याबाबतीत पुढे कोणकोणत्या गोष्टी करता येतील याची चर्चा करण्यात आली. अध्यक्षांना आता जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. या सर्वांचा आढावा घेण्यात आला, अशी माहिती जयंत पाटील यांनी दिली.

भविष्यात येणाऱ्या लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुकांसाठी तिन्ही पक्षाचे प्रमुख एकत्रित बसून हळूहळू लोकसभेच्या आणि विधानसभेच्या जागांच्या वाटपाबाबत चर्चा करणार आहोत. तिन्ही पक्षासोबत महाराष्ट्रातील काही इतर पक्ष आणि आमचे आघाडीचे घटक पक्ष या बैठकीत सहभागी होतील. एकत्रितपणाने महाविकास आघाडीचा अधिक चांगला समन्वय महाराष्ट्रातल्या जनतेपुढे ठेवून एक ठाम पर्याय महाराष्ट्रातल्या जनतेला सक्षमपणाने देण्याचा प्रयत्नाच्या निर्णयावर या बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व नेत्यांचे एकमत झाले आहे. त्यामुळे मला खात्री आहे की, महाविकास आघाडी कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रातदेखील जनतेच्या विश्वासास पात्र ठरून अधिक मोठ्या संख्येने ताकदीने पुढच्या काळात काम करेल, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

मविआच्या या बैठकीला राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, विरोधी पक्षनेते अजित पवार, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार संजय राऊत, खासदार सुप्रिया सुळे, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार भाई जगताप आणि अन्य महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते.

### वज्रमूठ सभा पुन्हा होणार

सध्या उन्हाळा प्रचंड प्रमाणात असल्यामुळे महाविकास आघाडीच्या बैठका थोड्याशा प्रलंबित ठेवलेल्या आहेत. थोडासा उन्हाळा कमी झाल्यानंतर जून महिन्यात पाऊसमान बघून आम्ही पुढच्या सभादेखील सुरू करणार आहे. जर पाऊसमान वाढलं तर मग काही ठिकाणी इनडोअर सभा घ्यायला लागतील. पण पाऊसमान आणि उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन स्थगित केलेली वज्रमूठ सभा थोड्या दिवसांनी पुन्हा सुरू करण्याचा आम्ही विचार करत आहोत, अशी माहिती जयंत पाटील यांनी दिली.

## मित्राच्या मदतीने आवारेंना संपवले




**पुणे** : जनसेवा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे हत्या प्रकरणात एक मोठा ट्विस्ट आला आहे. किशोर आवारे यांच्या हत्या प्रकरणात माजी नगरसेवक भानू खळदे यांचा मुलगा गौरव खळदे याला पोलिसांनी शनिवारी रात्री उशिरा अटक केली आहे. या हत्येचा तो मुख्य सुत्रधार असल्याचे समोर आलं आहे. हत्या प्रकरणात पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींनी ही कबुली दिली आहे. काही महिन्यांपूर्वी जुन्या नगरपरिषद परिसरात भानू खळदे आणि किशोर आवारे यांच्यात खडाजंगी झाली होती. तेव्हा आवारे यांनी भानू खळदे यांच्या कानशिलात लगावली होती. त्याचाच राग मनात ठेवून भानू खळदे यांचा मुलगा गौरवने बदला घेण्याचं ठरवलं. त्यानुसार नगरपरिषद कार्यालयातच किशोर आवारे यांची क्रूर पद्धतीने हत्या केली. त्यानंतर पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींकडे कसून चौकशी केली, तेव्हा त्यांनी गौरव खळदेच्या सांगण्यावरून हत्या केल्याची कबुली दिली आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## सरोगसीसंबंधीचा तिढा २ वर्षांनीही कायम

**मुंबई** : कृत्रिम गर्भधारणेसंदर्भात (एआरटी) कायद्यात अंतर्भूत केलेल्या नव्या निर्देशानुसार सरोगसी करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली असला तरी ही प्रक्रिया कशी करावी या संदर्भातील तिढा सुटलेला नाही. नोंदणी प्रक्रियेची जबाबदारी कोणत्या स्थानिक यंत्रणेवर असेल याचे कोणतेही निश्चित नियम देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे कायदा झाल्यानंतर दोन वर्षानंतरही सरोगसी, आयव्हीएफ करून अपत्यप्राप्तिचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या दाम्पत्यांची प्रतीक्षा संपलेली नाही.

## एअर इंडियाची नागपूर-मुंबई अतिरिक्त विमानसेवा २० मेपासून होणार सुरू

**नागपूर** : एअर इंडियाने नागपूर-मुंबईसाठी अतिरिक्त विमानसेवा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. येत्या २० मेपासून ही सेवा सुरू होणार असून २८ ऑक्टोबरपर्यंत ती राहील. एअर इंडियाचे एआय-१६१३ हे विमान २० मे रोजी सकाळी ११ वाजता मुंबईहून उड्डाण भरून नागपुरात दुपारी १२.२० वाजता येईल आणि हेच विमान एआय-१६१४ बनून नागपुरातून दुपारी १२:.५ वाजता उड्डाण भरेल व मुंबईला २.४५ वाजता पोहोचेल. कंपनीने नियमित विमानसेवेऐवजी अतिरिक्त उड्डाण भरण्याचा निर्णय घेतला आहे. हे विमान २० मे ते २८ ऑक्टोबरपर्यंत उड्डाण भरेल. त्यानंतर ते नियमित म्हणून उड्डाणाची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली. एअर इंडियाच्या या विमानामुळे अन्य विमान कंपन्यांच्या तिकिटदरात निश्चितच घसरण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एअर इंडियाचे आधी सुरू असलेले विमान मुंबईहून नागपुरात ८.३५ वाजता येते आणि नागपुरातून ९.२० वाजता मुंबईकडे उड्डाण भरते. नागपूर-मुंबई विमानसेवा सुरू करण्याची प्रवाशांची मागणी कंपनीने पूर्ण केली आहे.



## पोलिसांच्या प्रतिमेला काळीमा फसणारा प्रकार

**मुंबई** : छत्रपती संभाजी महाराजांवरील महानाट्याचे मोफत तिकिट दिले नाही म्हणून नाटक रोखण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार तथा अभिनेते अमोल कोल्हे यांनी पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील काही पोलीस कर्मचाऱ्यांवर केला होता. अमोल कोल्हेंच्या या आरोपांनंतर आता विविध स्तरांतून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही या संदर्भात प्रतिक्रिया दिली असून ही घटना पोलिसांच्या उज्ज्वल प्रतिमेला काळिमा फासणारी असल्याचे त्या म्हणाल्या.

## कर्नाटकचे पोलीस महासंचालक सूद सीबीआयचे संचालक



**कर्नाटक** : कर्नाटकचे पोलीस महासंचालक प्रवीण सूद यांची केंद्रीय अन्वेषण विभाग येथे संचालकपदी नियुक्ती झाली आहे. पुढील दोन वर्षांसाठी ते सीबीआयचे संचालक असणार आहेत. या पदाच्या नियुक्तीसाठी उच्च स्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. यामध्ये पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेत्याचा समावेश होता. सीबीआयचे विद्यमान संचालक सुबोध कुमार जयस्वाल यांचा कार्यकाळ २५ मे रोजी संपणार आहे. त्यामुळे त्यांच्या जागी नव्या संचालकाची निवड करण्याकरता उच्च स्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती.

## १६ नव्हे ५४ आमदारांच्या अपात्रेचा निर्णय घ्यायचायं!

### सभापती नार्वेकरांच्या वक्तव्यामुळे सारेच आचंबित

सुराज्य/मुंबई

शिवसेना विधिमंडळ पक्षात फूट पडल्याचे कोणतेही लेखी निवेदन माझ्यापुढे अद्याप सादर झालेले नसून १६ नव्हे, तर ५४ शिवसेना आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील याचिकांवर निर्णय घ्यायचा आहे, असे सूचक वक्तव्य विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी केले. यामुळे सारेच आचंबित झाले.

उद्धव ठाकरे यांना बहुमत चाचणी करण्याचे राज्यपालांचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरविले, पण ठाकरे यांनी स्वेच्छेने राजीनामा दिल्याने त्यांची पुन्हा मुख्यमंत्रीपदी नियुक्ती करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाच्या या मुद्द्याशी नार्वेकर यांनी असहमती दर्शविली. ठाकरे हे राजीनामा न देता विश्वासदर्शक ठरावाला सामोरे गेले असते, तरी बहुमत नसल्याने सरकार पडलेच असते. मग राज्यपालांचा आदेश चुकीचा ठरवून न्यायालयाने रद्द केला, तरी बहुमत नसलेल्या मुख्यमंत्र्यांना पुन्हा त्यापदावर नियुक्ती करणे कसे योग्य ठरले असते, असा सवाल नार्वेकर यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अपात्रतेच्या याचिकांबाबत नार्वेकर म्हणाले, की शिवसेनेत फूट पडली असल्याचे कोणतेही लेखी निवेदन व पुरावे माझ्यापुढे सादरच झालेले नाहीत.

विधिमंडळ नियमावलीनुसार अध्यक्षांचे अधिकार विधानसभेपुरतेच मर्यादित होते. पण न्यायालयाने त्यांची व्याप्ती वाढविली आहे. आता पक्षप्रतोदाचा निर्णय घेताना राजकीय पक्ष, त्याची घटना, प्रमुख, कोणाकडे बहुमत आहे हे तपासून प्रतोदाला मान्यता द्यावी लागणार आहे. माझ्यापुढे दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात एकूण ५४ याचिका सादर केल्या आहेत. सुयोग्य वेळेत (रिझनेबल टाइम) निर्णय घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

प्रत्येक याचिकाकर्त्यांला आणि प्रतिवादीला बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल. साक्ष व उलटतपासणी होईल. नैसर्गिक न्याय तत्त्वाचे आणि पुरावा कायद्यातील तरतुदींचे पालन केले जाईल. त्यामुळे सुनावणीसाठी किती कालावधी लागेल, हे आताच सांगता येणार नाही. पण लवकरात लवकर निर्णय देण्याचा माझा प्रयत्न राहील. भरत गोगावले यांना प्रतोद म्हणून मान्यता देताना पक्ष, प्रमुख आणि अन्य बाबी तपासण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे प्रतोद नियुक्तीविषयी शक्य तितक्या लवकर निर्णय घेतला जाईल, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

### सर्व बाबी तपासून प्रतोदांची नियुक्ती

भरत गोगावले यांची प्रतोदपदी झालेली नियुक्ती संसदीय पक्षाने केल्याने न्यायालयाने रद्दबातल केली आहे. आता प्रतोद म्हणून मान्यता देताना पक्ष, प्रमुख आणि अन्य बाबी तपासण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे सध्या शिवसेनेचे प्रतोद कोण, नवीन प्रतोद नियुक्ती करण्यासाठी किती कालावधी लागेल, आदी बाबींविषयी शक्य तितक्या लवकर निर्णय घेतला जाईल, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

## भर समुद्रात नौदलाकडून १५ हजार कोटींचे ड्रग्ज जप्त



सुराज्य/मुंबई

भर समुद्रात नौदल व नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरोने (एनसीबी) कोचीजवळील समुद्रात एका जहाजावर कारवाई करीत अवैध बाजारात १५ हजार कोटी रुपयांचे मूल्य असलेले २५०० किलो अमली पदार्थ जप्त केले. पाकिस्तानच्या मकरान समुद्रकिनाऱ्याहून निघालेल्या या जहाजावर शनिवारी झालेल्या या कारवाईत एका पाकिस्तानी व इराणी नागरिकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

पाकिस्तानी चाच्यांकडून भारतात अमली पदार्थांची तस्करी करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यामुळेच एनसीबी’ने नव्याने या प्रकारच्या धोक्यावर करडी देखरेख ठेवली आहे. त्याअंतर्गत मकरान समुद्रकिनाऱ्याहून निघालेल्या या जहाजाची माहिती एनसीबी’ला मिळाली होती. ही माहिती त्यांनी नौदलाला दिली. त्याआधारे नौदलाने या जहाजावर विविध माध्यमांतून करडी नजर ठेवली.

## ‘ते’ वक्तव्य संजय राऊतांना महागात पडले



सुराज्य/नाशिक

शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे वेगवेगळ्या वक्तव्यांमुळे नेहमीच चर्चेत असतात. सत्ताधाऱ्यांवर टीका करणं असो, त्यांच्यावर आरोप करणं असो, अथवा स्वतःवरील टीकेला उत्तर देणं असो संजय राऊत सातत्याने वेगवेगळी वक्तव्ये करत असतात. बऱ्याचदा ते सकाळी पत्रकार परिषद घेऊन सत्ताधाऱ्यांना धारेवर धरण्याचा प्रयत्न करताना दिसतात. परंतु अशाच एका पत्रकार परिषदेत केलेलं वक्तव्य त्यांना आता भोवणार अशी शक्यता वर्तवली जात आहे. कारण दोन दिवसांपूर्वी संजय राऊत यांनी नाशिकमध्ये एक पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत त्यांनी केलेल्या एका वक्तव्याप्रकरणी आता त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे सरकार बेकायदेशीर आहे, त्यांचा आदेश पाळू नका असं आवाहन संजय राऊत यांनी दोन दिवसांपूर्वी एका पत्रकार परिषदेत केलं होतं. त्यामुळे नाशिकच्या मुंबई नाका पोलीस ठाण्यात कलम ५०५ अंतर्गत संजय राऊत यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत दोन दिवसांपूर्वी एका कार्यक्रमासाठी नाशिक दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती. त्याचदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर निकाल दिला. या निकालावर भाष्य करताना संजय राऊत म्हणाले की, हे सरकार बेकायदेशीर आहे, लवकरच हे सरकार जाणार आहे, त्यामुळे सरकारी अधिकारी असतील, पोलीस अधिकारी असतील त्यांनी या बेकायदेशीर सरकारचे बेकायदेशीर आदेश पाळू नये.

या पत्रकार परिषदेत राऊत यांनी जे आवाहन केलं होतं, तसेच जे आरोप केले होते.

## बार्शीतील कुटुंबाला बदनामीची धमकी देऊन खंडणी प्रकरणातील आरोपींचा जामीन फेटाळला

सुराज्य/बार्शी

फिर्यादीने आरोपी विरुद्ध दाखल केलेला ३६ लाख रुपयांचा फसवणुकीचा फौजदारी खटला मागे घे म्हणून धमकी देऊन बदनामीकारक पोस्टर शहरात वाटून बदनामी टाळण्यासाठी पन्नास हजार रुपयांची मागणी केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध बार्शी शहर पोलिसात दाखल असलेल्या खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपी विजय बाळकृष्ण साळुंके, निखिल दत्तात्रय मस्के यांचा जामीन बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एल. एस. चव्हाण यांनी फेटाळला.

एका महिलेने याबाबत पोलीसात फिर्याद दिली होती. योगेश वसंत लोखंडे, जुगलकिशोर बन्सिलाल तिवाड़ी, सतीश सुरेश जाधव, विजय बाळकृष्ण साळुंखे, निखिल दत्तात्रय मस्के (सर्व रा. बार्शी) यांच्या विरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाणे येथे याबाबत गुन्हा नोंद आहे. यापैकी विजय साळुंके आणि निखिल मस्के यानी अटक पूर्व जामीनासाठी केलेला अर्ज अतिरिक्त सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

३६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फिर्यादी महिलेने न्यायालयात यातील संशयित आरोपी योगेश लोखंडे व सतीश जाधव यांचे विरुद्ध दाखल केलेला फौजदारी खटला मागे नाही घेतला तर तुझ्या कुटुंबाची बदनामी करीन अशी धमकी (दि. २६) एप्रिल रोजी सकाळी योगेश लोखंडे, जुगलकिशोर तिवाडी, सतीश जाधव यांनी चारचाकी गाडी घेऊन फिर्यादीचे घरी येऊन दिली. तसेच खटला मागे न घेतल्यास बदनामीकारक पोस्टर वाटप करून तुझ्या कुटुंबाची व तुझ्या नवऱ्याची बदनामी करीन असे धमकावले.

दि. २६ रोजी संशयितांनी शहरातील बस स्टँड परिसरात पोस्टर वाटले, फिर्यादीचे पती यांना फोनद्वारे कळवले पतीने बदनामी होत आहे बोलवून घेऊन मिटवून टाक., मनस्ताप नको म्हणून पत्नीस फोन केला. ती बदनामी टाळण्यासाठी फिर्यादीने लोखंडे, तिवाडी, जाधव यांना बोलावून घेतले. या तिघांनी फिर्यादीस तुझ्या कुटुंबाची बदनामी करणारे फोटो बसस्टँड परिसरात वाटणे सुरू आहे. रोख ५० हजार रुपये आताच दे, तरच मी थांबवतो असे धमकावले. पैसे रोख नाहीत खात्यावर पाठवू का? असे म्हणाल्यावर तिवाडी व जाधव याने योगेशच्या खात्यावर आता फक्त पाच हजार पाठव, त्याचे खाते आहे.तसेच उरलेले ४५ हजार रुपये उद्या सकाळी ११ वाजेच्या आत रोख दे असे पैसे खात्यावर ऑनलाइन घेता येत नाहीत असे सांगून कागदावर लोखंडे याचा खाते क्रमांक देऊन त्यावर पैसे पाठवायला सांगितले. आरोपींनी धमकावल्यामुळे आणि बदनामी थांबवण्यासाठी भीतीने फिर्यादीने लोखंडेच्या खात्यावर पाच हजार रुपये पाठवले. दि. २७ रोजी लोखंडे, तिवाडी व जाधव यांनी सकाळी फिर्यादी व पतीचे फोनवरून पैसे मागितले. नंतर तिवाडी यांच्या मोबाइल नंबरवरून फिर्यादीचा मोबाइल नंबरवर एसएमएस आला. वेळ संपला, तुम्ही दोघे नवरा बायको फोन उचलत नाहीत. आता तुम्ही फोन करा आम्ही उचलणार नाहीत.

विजय साळंखे आणि निखिल मस्के यांनी आम्हाला पोस्टर वाटायला पैसे दिले आहेत. आता बसा रडत असा उल्लेख आहे. त्यामुळे या संगनमताने केलेल्या कटकारस्थानामध्ये विजय साळुंखे, निखिल मस्के हेही सहभागी आहेत.

अशा आशयाची तक्रार दिली आहे. त्यावरून संशयितांवर गुन्हा दाखल झालेला आहे. यातील आरोपी फरार असून पोलीस त्यांच्या शोधात आहेत. अटक पूर्व जामीन अर्जाच्या सुनावणीसाठी सरकारी वकील श्रीमती आर. एम. कदम तसेच मूळ फिर्यादी तर्फे ॲड. प्रशांत एडके यांनी काम पाहिले तर आरोपीतर्फे ॲड. अनिल पाटील यांनी बाजू मांडली. न्यायालयाने गुन्ह्याचे गंभीर स्वरूप पाहता अटकपूर्व जामीन फेटाळला आहे.

## शेतकऱ्यांच्या अनाथ मुलांवर मायेचा हात

### आई होऊन ५० मुला-मुलींचा सांभाळ

सुराज्य/पुणे

एखाद्या मुलींचं लग्नाचं झाल्यावर आपला सुखाचा संसार असावा, ऐशो आरमाचं आयुष्य असावं अशी प्रत्येक मुलीची इच्छा असते. मात्र एका आयटी इंजिनियरशी लग्न होऊन कोणतीही अपेक्षा न करता अर्चना देशमाने यांनी पतीसोबत संपूर्ण आयुष्य स्नेहवन या संस्थेतील मुलांचं जीवनमान उंचावण्यासाठी द्यायचं ठरवलं आहे. या स्नेहवनमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकरी, ऊसतोड कामगार, शेतमजूर,



दुष्काळग्रस्त भागांतील आर्थिकदृष्ट्या गरीब शेतकऱ्यांच्या मुलांची जबाबदारी अर्चना एकट्या उचलत आहेच. गेली सात ते आठ वर्षांपासून ५० मुलांची आई बनून त्यांचा सांभाळ करत आहे.

या मुलांचं शिक्षण, संगोपनासाठी आणि शैक्षणिक त्याचबरोबर मुलांचा अभ्यास घेणं तसंच मुलांच्या पूर्नवसनाबरोबरच त्यांचा सांभाळ करण्याचं काम त्या करतात. त्यांच्या आयुष्यामध्ये अनेक कठीण प्रसंग आले. त्यात त्यांच्या पहिल्या बाळंतपणात त्यांना त्यांचं मुल देखील गमावावं लागलं, पण त्यांनी नव्याने उभारी घेत येथील मुलांना आपलं मुल मानून त्यांची सेवा करण्याचं ठरवलं. उच्च शिक्षित असूनही अर्चना यांनी या सामजिक कार्यात स्वतःला झोकून दिलं आहे. या कामात त्यांचे पती देखील तितक्याच उत्सुकतेने त्यांना मदत करतात.

सध्या स्नेहवन मध्ये ५० निवासी मुलं असून खेड तालुक्यातील आळंदी जवळ असणाऱ्या कोयाळी फाटा येथे हे स्नेहवन आहे. एका कंपनीने या जोडप्याचं काम पाहून मुलांच्या आसऱ्यासाठी इमारत बांधून दिली आहे. ५० मुलांची आई होऊन त्यांचं संगोपन करणं, एकटीने एवढ्या मुलांचं जेवण तयार करणं, त्यांचा सांभाळ करणं हे सोपं काम नाही.

एका मराठवाड्यात राहणाऱ्या शेतकरी कुटुंबातील तरुणाने राज्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबांमधील मुलामुलींना मोफत निवासासह शिक्षण देण्याचा निर्धार करत आळंदी येथील ’स्नेहवन’ ही सामाजिक संस्था उभारली आहे. शेतकरी अशोक बाबाराव देशमाने या उच्चशिक्षित तरुणाने कष्टातून ही संस्था उभारली आहे. या संस्थेत त्यांनी पत्नीला सोबत घेऊन अशा मुलांचा सांभाळ करण्याचं ठरवलं आहे.




# माढा लोकसभेसाठी मोहिते-पाटील यांच्या हालचाली

**उल्हास पाटील**



**माढा लोकसभेच्या निमित्ताने राज्याचे लक्ष वेधून घेतलेल्या राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात म्हणजे माढा लोकसभेच्या गत निवडणुकीत भाजपाने जोरदार मुसंडी मारली होती. रणजितसिंह नाईक निंबाळकरांच्या रुपाने तब्बल ८५ हजारांचे मताधिक्य मिळवून भाजपने दणदणीत विजय संपादन केला. यामध्ये अकलूजचे मोहिते पाटील हे खरे विजयाचे शिल्पकार होते, असे म्हणावे तर वावगे ठरणार नाही.पण आगामी लोकसभेसाठी माढा मतदार संघातून यावेळी रणजितसिंह मोहिते पाटील यांची एन्ट्री होणार असल्याचे नागरिक व त्यांच्या कार्यकर्त्यांतून बोलले जात आहे.**

जिल्ह्याच्या राजकारणात एकाच पक्षात राहून नेहमीच एकमेकांविरुद्ध शह काटशहचे राजकारण करणारे अनेक नेते आहेत. त्यापैकी मागील काळात शिंदे आणि मोहिते पाटील गट हे सर्वश्रूत आहे.परंतु गत लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी रणजितसिंह मोहिते पाटलांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत भाजपा मध्ये प्रवेश केला आणि तत्कालीन जि.प.चे अध्यक्ष संजय शिंदे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश करत लोकसभेची उमेदवारी मिळवली होती. त्यामुळे खऱ्या अर्थाने सामना रंगला तो शिंदे आणि मोहिते पाटील या दोन गटांमध्ये. यावेळी राष्ट्रवादीचे संजय शिंदे यांच्याविरोधात सर्व ताकदीनीशी निवडणुकीच्या रिंगणात भाजपचे रणजितसिंह निंबाळकर यांना बळ देण्याचे रणजितसिंह मोहिते पाटलांनी ठरविले होते.

त्याचबरोबर रणजितसिंह मोहिते पाटील यांचे पिता माजी खासदार विजयसिंह मोहिते पाटील हे गत निवडणुकीवेळी राष्ट्रवादीचे खासदार असून देखील त्यांनी राष्ट्रवादी पक्षात गेली दहा वर्षापासूनची होणारी घुसमट व दबाव झुगारुन विरोधी भाजपाच्या प्रचारसभेत हजेरी लावून राष्ट्रवादीविरोधात उघड उघड बंड पुकारले होते. आणि अचुक संधी साधत सोलापूर जिल्ह्यातील त्यांना मानणारे व दुरावलेले परिचारक,जानकर,कल्याणराव काळे,शहाजी पाटील, गोरे बंधू तसेच शिंदेपासून दुरावलेले माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे,राजाभाऊ चवरे,या सर्वांना पुन्हा एकत्र करुन निवडणुकीत वर्चस्व मिळवून राष्ट्रवादीला नामोहरम करण्यासाठी पूर्ण ताकद पणाला लावून चुरशीने मतदान पार पाडले होते. माढा लोकसभा मतदार संघामध्ये माण,फलटण,माळशिरस माढा ,करमाळा व सांगोला असे सहा विधानसभा मतदार संघ येत असून या सहा मतदार संघातून भाजपच्या निंबाळकरांनी ५ लाख ८६ हजार ३१४ मते मिळविली तर राष्ट्रवादीच्या संजय शिंदे यांनी ५ लाख ५५० मते मिळवली. एकट्या माळशिरसमधून राष्ट्रवादीच्या संजय शिंदें विरोधात तब्बल १ लाख ६३० मतांचे मताधिक्य भाजपाच्या रणजितसिंहाना दिले होते. ते मताधिक्य कोणत्याच प्रकारे राष्ट्रवादीच्या उमेदवाराला कमी करणे शक्य नव्हते. अखेर ८५ हजार ७६४ मतांनी भाजपाच्या रणजितसिंहांचा दणदणीत विजय झाला होता.

मात्र, निंबाळकरांना सांगोला सोडले तर माढा मतदार संघात फारशी छाप सोडता आली नाही. बारामतीला पळवून नेलेले पाणी पुन्हा परत आणले पण ते किती आणले काय झाले? याबाबत पुन्हा वाच्यता नाही. कुर्डुवाडी रल्वे कारखाना असेल, गेट नं.३८ वरील उड्डुणपूल असेल याबाबत फार कोणती आग्रही भूमिका घेताना ते कधी दिसले नाहीत. कार्यकर्त्यांनी निवेदन द्यायचे त्यांनी ते घ्यायचे आणि त्यांनी आश्वासन द्यायचे यापलीकडे काही घडलेच नाही. सांगोला येथून किसान रेल्वे व फलटण - पंढरपूर रेल्वे मार्ग मंजूर केला याशिवाय ठोस कोणते काम यांचे दिसत नाही. साधे माढा तालुक्यात कुठे यांचे संपर्क कार्यालय नाही. कुरघोडीच्या राजकारणात विकासाकडे दुर्लक्ष झाले. राष्ट्रवादीच्या बालेकिल्लयात विजयी झालेल्या भाजपात दोन गट निर्माण झाले. एकंदरीत भाजपचे पक्षश्रेष्ठीही रणजितसिंह निंबाळकर यांच्यावर नाराज असल्याचे बोलले जात आहे.


आगामी लोकसभा डोळ्यासमोर ठेऊन रणजितसिंह मोहिते पाटील हे सातत्याने माढा मतदार संघाचे दौरे करत असून सामान्य कार्यकर्त्याच्या कौटुंबिक कार्यक्रमाला दखील ते आवर्जून उपस्थित राहतात. शिवाय माढा लोकसभा मतदार संघातील अनेक प्रश्न सातत्याने मोहिते -पाटील आपल्यापरिने मांडून सोडवण्याचा प्रयत्न करत असताना दिसत आहेत. त्यामुळे आगामी लोकसभेसाठी माढा मतदार संघातून भाजपच्या दोन रणजितसिंहांमध्ये अंतर्गत चुरस निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. भविष्यात रणजितसिंह मोहिते पाटील यांना जर माढा लोकसभेसाठी उमेदवारी मिळाली तर पुन्हा मोहिते विरुद्ध शिंदे सामना पाहायला मिळणार की? भविष्यात राजकीय चित्र आणखी काही वेगळे दिसणार? हे येणारा काळच ठरवणार आहे.

# अक्कलकोटमध्ये भाजपला अच्छे दिन तर काँग्रेसला आली मरगळ

**रविकांत धनशेट्टी**

**अक्कलकोट विधानसभेच्या निवडणुकीनंतर तालुक्यात मोठ्या निवडणुका झाल्या नव्हत्या. नुकत्याच झालेल्या अक्कलकोट आणि दुधनी बाजार समितीच्या निवडणुकीत भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आ. सिद्रामप्पा पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपने विजय मिळवला. त्यामुळे भाजपाला अच्छे दिन आल्याने कार्यकर्त्यात उत्साह आहे तर काँग्रेस कार्यकर्त्यात पराभवामुळे मरगळ दिसून येत आहे ही मरगळ दूर करण्याचे आव्हान माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्यासमोर राहणार आहे.**





अक्कलकोट तालुका पूर्वी काँग्रेसचा बालेकिल्ला होता पण तो आता हळूहळू ढासळल्याचे चित्र निर्माण झाले आहे. मुळात केंद्रात आणि राज्यात वरिष्ठ पातळीवर काँग्रेसमध्ये ताकदवान नेत्यांची वाणवा असल्यामुळे खालीपर्यंत त्याची झळ पोहचत आहे. एकेकाळी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या ताब्यात आमदारकी तसेच मंत्रिपद होते. त्यावेळी काँग्रेसचा खूप मोठा दरारा हा जिल्ह्यामध्ये नव्हे तर राज्यामध्ये होता.त्यांचे सरकार असेपर्यंत तो टिकून होता. मात्र जसे जसे केंद्रातील वातावरण बदलत गेले तसतसे राज्यातील व जिल्ह्यातील समीकरणे बदलत गेली. तरीही म्हेत्रे यांनी मोदी लाटेमध्ये २०१४ च्या निवडणुकीत विजय साकारून काँग्रेसला अच्छे दिन आणले होते. याचे कौतुक काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात झाले होते.२०१९ ला मात्र हा वारू आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी रोखला.

२०१९ च्या पराभवामुळे गावोगावी काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये मरगळ आलेली आहे. कट्टर कार्यकर्त्यांची वाणवा दिसत आहे. आगामी काळात कार्यकर्त्यांना आलेली मरगळ झटकून नव्या जोमाने काम करावे लागेल तरच यश मिळणार आहे. म्हेत्रे हे काँग्रेसचे निष्ठावान नेते आहेत. त्यामुळे भविष्यकाळाच्या दृष्टीने त्यांना उभारीसाठी मोठ्या नेत्यांच्या पाठबळाची गरज आहे. याउलट भाजपमध्ये केंद्रात आणि राज्यात सत्ता आहे, सध्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सचिन कल्याणशेट्टी हे विश्वासू आमदार असल्याने याचा पुरेपूर फायदा आमदार सचिन कल्याणशेट्टीना होत आहे. फडणवीस यांनी त्यांना जिल्हाध्यक्षपद देऊन भाजपच्या जिल्ह्याचा कारभारच त्यांच्याकडे दिला आहे. नुकत्याच झालेल्या दोन्ही बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसचा पराभव करून कल्याणशेट्टींनी आपली राजकीय क्रेझ कायम ठेवली आहे. आता सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती, नगरपालिका हस्तगत करण्यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी हे टोकाचे प्रयत्न करणार, हे बाजार समिती निवडणुकीदरम्यान झालेल्या संघर्षावरून दिसून येते.

दुधनी व अक्कलकोट या दोनही नगर पालिकेच्या ठिकाणी भाजपची सत्ता आहे तर ग्रामीण भागात अजूनही काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग आहे. आता हा वर्ग नेस्तनाबूत करून भाजप तळागाळात पोहोचवण्याचा मानस आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा आहे .एकूणच काय तर या पुढच्या निवडणुका एकमेकांच्या राजकारणाच्या मुळावर उठणार आहेत आणि प्रत्येक नेत्यांच्या राजकारणासाठी करो या मरोची स्थिती राहणार आहे. अक्कलकोट आणि दुधनी बाजार समितीतील पराभवानंतर आता आगामी निवडणुका काँग्रेस पक्षासह मित्र पक्षांसाठी आव्हानात्मक बनल्या आहेत.

या उलट भाजपने या दोन्ही बाजार समित्या जिंकून त्यांची ताकद वाढविली असून त्या आत्मविश्वासाच्या जोरावर आगामी निवडणुका जिंकण्याची तयारी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी चालवली आहे.भाजपची चाललेली घोडदौड रोखून २०२४ ची विधानसभा जिंकण्याचे खूप मोठे आव्हान आता काँग्रेससमोर म्हणजेच म्हेत्रे यांच्यासमोर राहणार आहे. ते आव्हान आता कशापद्धतीने पेलतात याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### कल्याणशेट्टींना सिद्रामप्पांची साथ

माजी आमदार सिद्रामप्पा पाटील हे अतिशय मुरब्बी नेते म्हणून जिल्ह्यात परिचित आहेत.ते आमदार कल्याणशेट्टी यांच्या बाजूने आहेत, ही त्यांची मोठी जमेची बाब आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत त्यांची महत्त्वाची भूमिका ठरली आहे. स्वामी समर्थ साखर कारखाना आणि दोन बाजार समितीच्या निवडणुकीत भाजपला यश मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.

### वरिष्ठ पातळीवरून म्हेत्रेंना बळ देण्याची गरज

राज्य पातळीवर काँग्रेसची सुरू असलेली फरपट ही खालीपर्यंत पोहोचली असल्याने आता उभारी कशी मिळणार याची चर्चा गावा गावातील कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे.त्यामुळे वरिष्ठ पातळीवरून आता म्हेत्रें सारख्या नेत्यांना सर्व दृष्टीने बळ देण्याची गरज आहे तरच काँग्रेस टिकणार आहे,असे कार्यकर्त्यातून सांगितले जात आहे.

# सहकार शिरोमणीच्या सभासदांसमोर सक्षम पर्याय

कारखान्याच्या **सूरज सरवदे** बसण्याची शक्यता

**सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून गेल्या २० २२ वर्षापासून कारखान्याची धुरा चेअरमन कल्याणराव काळे हे सांभाळत आहेत. त्यांनी कारखान्याचे विस्तारीकरण केले आहे. उपपदार्थ प्रकल्प कार्यन्वित केले आहेत. मात्र, त्यांना कारखाना पूर्ण क्षमतेने चालवता आला नाही. कारखान्यामध्ये कल्याणराव काळे यांची मजबूत पकड आहे. नातेसंबंधात सर्व सभासद वर्ग जोडला गेला आहे. त्यामुळे कल्याणराव काळेंच्या साम्राज्याला आजपर्यंत कोणी छेद दिला नाही. कल्याणराव काळे यांची पकड असल्यामुळे कारखान्यात सत्तांतर झाले नाही. मात्र गेल्या काही वर्षापासून कारखान्याची आर्थिक परिस्थिती डबघाईला आली आहे. कारखान्याला पतपुरवठा करण्यासाठी बँका तयार नाहीत. मागील गळीत हंगामात बँकांनी कारखान्याचा कर्ज दिली नव्हती. त्यामुळे व्यापाऱ्याकडून पैसे घेऊन कारखाना सुरू केला होता.**




### शरद पवार यांच्यासमोर झालेली चर्चा फिस्कटली

सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसंदर्भात शरद पवार यांच्या समोर अभिजित पाटील, कल्याणराव काळे, भगीरथ भालके, गणेश पाटील यांच्यात मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीसाठी दिपक पवार यांनी बोलवले नसल्यामुळे निवडणुकीचा तोडगा निघू शकत नाही असे अभिजित पाटील यांनी पवारांना सांगितले. उमेदवारी अर्जाची छाननी झाल्यानंतर पुन्हा शरद पवार यांच्या समोर बैठक घेतली जाईल असे सांगितले आहे.

दुसरे वैशिष्ट्य म्हणजे कारखाना कधीच वेळेवर शेतकऱ्यांची देणे देत नाही. अशी सर्वत्र आरेड आहे. यावर्षीचे ऊस बिल पुढच्या वर्षी शेतकऱ्यांना मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड नाराजी चेअरमन कल्याणराव काळे आणि त्यांच्या संचालक मंडळावर आहे. सभासदांच्या नाराजीचा फटका यंदा कल्याणराव काळे यांना बसण्याची शक्यता आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत माजी संचालक दीपक पवार आणि डॉ. बी. पी. रोंगे यांनी स्वतंत्र पॅनल उभा करून कल्याणराव काळे यांच्या विरोधात रणशिंग फुंकले होते. मात्र, दोन पॅनल झाल्यामुळे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या विजय झाला होता. गेल्या दहा वर्षापासून दीपक पवार यांनी कल्याणराव काळे यांच्या विरोधात रान उठवले आहे. शेतकऱ्यांना एफआरपी मिळवून देणे, सिताराम साखर कारखान्याच्या गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी दीपक पवार यांनी प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये त्यांना चांगले यश सुद्धा मिळाला आहे.

शेतकऱ्यांचे बिल वेळेवर न दिल्यामुळे कारखान्याची भिस्त ज्या नातेवाईकांवर होती, ते नातेवाईक आज कल्याणराव काळे यांच्यापासून दुरावले आहेत. नंदकुमार बागल, धनंजय काळे यांच्यासारखे जवळचे नातेवाईक दुरावल्याचा मोठा फटका कल्याणराव काळे यांना होऊ शकतो. त्यामुळे पहिल्यांदाच या कारखान्याच्या निवडणुकीत मोठी रंगत पाहायला मिळत आहे. शेतकऱ्याचा असंतोष कधी नव्हे तो बाहेर पडत आहे. त्यामुळे परिवर्तनाची चाहूल सरकार शिरोमणीच्या निवडणुकीत सभासदांना दिसत आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर अभिजीत पाटील यांनी सत्ता प्रस्थापित केल्यानंतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वास अभिजीत पाटील यांनी संपादन केला आहे. ऊसाला एफ आर पी पेक्षा जास्त दर दिला आहे. शेतकऱ्यांचे ऊस बिल वेळेवर दिले आहे. त्यामुळे शेतकरी आनंदी आहे. अभिजीत पाटील यांच्याकडे सत्ता आल्यामुळे उसाला चांगला दर मिळत आहे. शेतकऱ्याला सुगीचे दिवस आले आहेत. त्यामुळे सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांना पहिल्यांदाच सक्षम पर्याय अभिजीत पाटील यांच्या रूपात दिसत आहे.सध्या परिस्थितीमध्ये कारखान्याची आर्थिक परिस्थिती ही बिघडलेली आहे. शेतकऱ्यांना ऊसाला चांगला भाव मिळत नाही. वेळेवर उसाचे बिल मिळत नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी हे पिसलेले आणि दबलेले आहेत. अभिजीत पाटील यांच्या रूपाने त्यांना सक्षम पर्याय उपलब्ध झाला आहे.

# सोपलांच्या भूमिकेवर बार्शीत ठाकरे गटाचे भवितव्य ठरणार

**सचिन अपसिंगकर**

**सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर शिंदे-फडणवीस सरकारवर असलेली अस्थिरतेची टांगती तलवार बाजूला सरकली आहे. आता बार्शीत आगामी काळात निवडणुका होणार आहेत. सध्याचे अपक्ष आमदार राजा राऊत हे भाजपवासीच आहेत. त्यांचे आतापर्यंत प्रतिस्पर्धी दिलीप सोपल यांनी मात्र आपली भूमिका जाहीर केली नाही. ते २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत गेले होते. आता उद्धव ठाकरे यांची सेना फुटली आहे. असे असले तरी अद्याप सोपल यांनी स्पष्ट भूमिका जाहीर केली नाही. त्यांच्या भूमिकेवरच आता बार्शीतील ठाकरे गटाचे भवितव्य ठरणार आहे.**



सोलापूर जिल्ह्यात १९९५ साली शिवसनेच्या चिन्हावर सर्वाधिक आमदार निवडून आले होते. सोलापूर जिल्हा शिवसेनेचा बालेकिल्ला होता. बार्शी तालुक्यात १९९६ सालापासून शिवसेना सक्रिय आहे. शिवसेनेला राऊत यांच्या रूपाने तगडे नेतृत्व लाभले होते. १९९९ साली शिवसेनेकडून विधानसभेला पराभूत झालेले राजेंद्र राऊत हे २००४ साली शिवसेनेकडून निवडून आले. त्यानंतर ते २००५ साली काँग्रेसवासी झाले. सन २०१४ साली त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर राऊत यांनी २०१७ साली शिवसेना सोडली. त्यापूर्वी बार्शीमध्ये २००९ साली विश्वासभाऊ बारबोले यांनी शिवसेनेच्या वतीने विधानसभेची निवडणूक लढवली होती. शिवसेनेला २०११ साली भाऊसाहेब आंधळकर यांचे नेतृत्व लाभले. त्यांनी शिवसेनेचा भगवा फडकवत ठेवण्याचे काम सुमारे १० वर्ष केले. २०१९ साली तत्कालीन राष्ट्रवादीचे आमदार व माजी मंत्री दिलीप सोपल यांनी शिवसेनेत प्रवेश केला. राज्यातले महाविकास आघाडी सरकार गडगडल्यानंतर शिवसेनेच्या अनेक मंत्री, आमदार, माजी खासदार व आमदारांनी शिवसेनेची साथ सोडली व ते शिंदे गटात डेरेदाखल झाले. मात्र सोपल यांनी शिवसेना सोडण्याबाबत सुतोवाच केले नाही. त्यांनतर सोपल हे राष्ट्रवादीकडे झुकल्याच्या चर्चेला वेग आला होता. मात्र सोपल यांनी स्पष्ट भूमिका जाहीर केली नाही. सोपल हे सुध्दा अनेक नेत्याप्रमाणे सर्वाच्च न्यायालयाच्या निकालाची वाट पहात असल्याबाबतच्या शक्यता वर्तवल्या जात होत्या. आता बार्शीमध्ये ठाकरे गटाचे भवितव्य ठरणार आहे. राज्याच्या राजकारणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडी एकत्रितपणे लढविणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. बार्शीचे आमदार राऊत हे पूर्णपणे भाजपावासिय आहेत. आगामी निवडणुका लक्षात घेता सोपल यांनाही तालुक्यातील प्रमुख राजकीय नेते म्हणून आपली भूमिका स्पष्ट करत निर्णय घ्यावा लागणार आहे. बार्शीमध्ये सोपल जे राजकीय भूमिका घेतील, त्यावर बार्शीतल्या ठाकरे गटाचे भवितव्य ठरणार आहे. भाऊसाहेब आंधळकर यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी विजय शिवतारे यांना बोलावून शिंदे गटाचे बस्तान बार्शीत बसविण्याची तयारी केली आहे. आगामी काळात बार्शीतल्या ठाकरे गटाला मोठे खिंडार पडते की हा गट पुन्हा सोपल यांच्या नेतृत्वाखाली नव्या दमाने कामाला लागतो, हे येणारा काळ ठरविणार आहे.

### आगामी वाटचाल ठाकरे गटासाठी खडतरच

आगामी निवडणुका बार्शीतील सर्वच राजकीय पक्ष आणि गटातटांच्या राजकीय वाटचालीसाठी महत्वाच्या आहेत. वैरागमध्ये पंचायत निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी, भाजपा असा सामना रंगला होता. बार्शीमध्ये पक्षापेक्षा व्यक्तिनिष्ठ राजकारणाची चलती आहे. बार्शी तालुक्यात ठाकरे यांचे पक्षात अधिपत्य असताना नगरपालिका, पंचायत समिती, विधानसभा सदसत्व अशा सर्व निवडणुकांमध्ये शिवसेनेला मतदाराने कौल दिला होता. एकंदरीतच आगामी वाटचाल ठाकरे गटासाठी खडतरच आहे. अशा परिस्थितीमध्ये या गटाला कशी नवसंजीवनी मिळते याकडे कट्टर ठाकरेनिष्ठ शिवसैनिक व जनतेचे लक्ष आहे.

# पाणी प्रश्न भाजपला अडसर

**अजित उंब्रजकर**

**सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर भाजप शिवसेना सरकारला कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर होतील, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेचा विचार करता दुसऱ्यांदा सत्ता मिळवण्यासाठी भाजपला प्रयत्नांची मोठी पराकाष्टा करावा करावी लागणार आहे. विरोधी पक्षापेक्षा स्थानिक प्रश्न खास करून न सोडवता आलेला पाणी प्रश्न भाजपच्या विजयात मोठा अडसर ठरण्याची शक्यता आहे.**

२०१७ मध्ये भाजपने मोठा विजय मिळवत सोलापूर महापालिकेत प्रथमच एक हाती सत्ता मिळवली होती. या महापालिका निवडणुकीपूर्वी भाजपने रोज पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. गेल्या अनेक वर्षांपासून पाणीपुरवठाच्या विस्कळीतपणाला कंटाळलेल्या सोलापूरकरांनी या निवडणुकीत भाजपला भरभरून मते दिली. मात्र सत्तेच्या काळात भाजपला हा पाणी प्रश्न सोडवता आला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते समांतर जलवाहिनीचे उद्‌घाटन झाले. मात्र या नात्याकारणाने समांतर जलवाहिनीचे काम रखडतच गेले. हा प्रकल्प रखडल्यामुळे या प्रकल्पाची किंमतही सुमारे दीडशे ते दोनशे कोटींनी वाढली आहे. तरीही लोकप्रतिनिधी हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी गांभीर्य घेत नाही, हे दुर्दैव म्हणावे लागेल. गेल्या काही महिन्यांपासून तर सोलापूरचा पाणी प्रश्न अत्यंत जटिल बनला आहे. शहराच्या अनेक भागात पाच ते सहा दिवसात पाणीपुरवठा होत आहे. दर दोन ते तीन दिवसांनी महापालिकेवर रोज एका पक्षाचे अथवा संघटनांचे आंदोलन होताना दिसत आहे. सध्या महापालिकेवर प्रशासकराज असले तरी केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे. असे असतानाही सोलापूरमधील स्थानिक भाजपच्या आमदाराने खासदारांनी या पाणी प्रश्नावर अद्याप एकही बैठक घेतल्याचे दिसत नाही. आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी हे भाजपचे कार्यक्रम आणि नेत्यांचे दौरे सोडले तर विकास कामांच्या बाबतीत एकत्र कधीही आले नाहीत. त्यामुळे सोलापूरकरांमध्ये भाजपच्या लोकप्रतिनिधीबद्दल एक सुप्त रोष आहे. याचाच फटका महापालिका निवडणुकीत बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

नुकतेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सोलापुरात आले होते, त्यांना पत्रकारांनी स्थानिक प्रश्नाविषयी म्हणजेच पाणी प्रश्न, स्मार्ट सिटीची कामे, विमानतळाचा प्रश्न याबाबत विचारले असता त्यांच्यासोबत असलेल्या लोकप्रतिनिधींचे चेहरे मात्र बघण्यासारखे झाले होते. भले त्यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपण कोअर कमिटीच्या बैठकीत याबाबत लोकप्रतिनिधींशी चर्चा करू असे सांगितले असले तरी त्यांनी चर्चा केली की नाही आणि त्या चर्चेचे गांभीर्य हे लोकप्रतिनिधी किती घेतात यावरही सर्व काही अवलंबून आहे. सोलापूर महापालिकेची निवडणूक कधीही लागण्याची शक्यता आहे. काँग्रेस राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे गट यांची महाआघाडी सोलापुरात होईल की नाही याची शाश्वती नाही. जरी झाली तरी या महाआघाडीपेक्षा भाजप समोर न सोडवता आलेला पाणी प्रश्न आणि शहरातील रखडलेली विकास कामे हेच मोठे आव्हान असणार आहे.

### स्थानिक पालकमंत्री गरजेचाच

काही दिवसात मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. या मंत्रिमंडळ विस्तारात सोलापूरला स्थान मिळणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या सोलापूरला गेल्या साडेतीन वर्षांपासून स्थानिक पालकमंत्री नाही. त्यामुळे अनेक कामे मार्गी लागत नाहीत. सध्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील महिना दोन महिन्यातून सोलापूरला येतात, त्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे मंत्रीपद शहराला मिळो अथवा जिल्ह्याला मिळो अनेक पालकमंत्री असणे गरजेचे आहे तरच सोलापुरातील अनेक प्रकल्प लवकर मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे